❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २७२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांत कोरडा दुष्काळ जाहीर!

## राज्याच्या ७५ टक्के भागाला तातडीने दिलासा; कर्जवसुलीस स्थगिती, परीक्षा फी माफीसह मुख्यमंत्र्यांचे १२ मोठे निर्णय



■ मुंबई (दै. संध्या)

पावसाच्या मोठ्या खंडाने आणि अल निनोच्या प्रभावामुळे खरीप हंगाम पूर्णपणे धोक्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा व दिलासादायक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील 358 पैकी तब्बल 265 तालुक्यांमध्ये अधिकृतरीत्या कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. कृषी आयुक्तांच्या अहवालानुसार या तालुक्यांमध्ये दुष्काळाची पहिली कळ (Trigger-1) लागू झाली असून, महसूल व मदत-पुनर्वसन विभागाने याबाबतचा अधिकृत शासन निर्णय (GR) निर्गमित केला आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के भूभाग आता दुष्काळग्रस्त म्हणून घोषित झाला असून, शेतकऱ्यांसाठी सवलतींची घोषणा करण्यात आली आहे. "यंदाचा दुष्काळ अत्यंत गंभीर आहे. शेतातील पिके करपून गेल्यामुळे बळीराजाच्या हातात काहीही उरलेले नाही. अशा कठीण समयी सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही," असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. कृषी आयुक्तालयाच्या अहवालानुसार, जून महिन्यापासून ते आजतागायत पर्जन्यमानात प्रचंड तूट राहिली असून विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात परिस्थिती अत्यंत बिकट बनली आहे.

मराठवाड्यातील 74 च्या 74 तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-1' लागू झाला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर (9 तालुके), जालना (8), बीड (11), लातूर (10), धाराशिव (8), नांदेड (14), परभणी (9) आणि हिंगोली (5) या सर्व जिल्ह्यांचा समावेश आहे.

नाशिक महसूल विभागातील जळगावमधील सर्वाधिक 15 तालुके, अहिल्यानगरमधील 14, नाशिकमधील 10, नंदुरबारमधील 6 आणि धुळे जिल्ह्यातील 4 तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. नुकसानीचे मूल्यांकन पारदर्शक आणि अचूक व्हावे यासाठी शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक बाधित शेतातील उभ्या पिकांची विदारक स्थिती दर्शवणारी छायाचित्रे आणि त्या ठिकाणचे अचूक जीपीएस कोऑर्डिनेट्स नोंदवूनच पंचनामे केले जातील. कृषी आयुक्त यांच्यामार्फत हा अहवाल शासनाकडे सादर केला जाईल, ज्या आधारे बाधित शेतकऱ्यांसाठी प्रत्यक्ष आर्थिक नुकसानभरपाईचा स्वतंत्र आदेश काढला जाणार आहे.

### नुकसानभरपाईचा स्वतंत्र निर्णय लवकरच

मदत व पुनर्वसन विभागाचे सहसचिव संजय इंगळे यांच्या डिजिटल स्वाक्षरीने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. पिकांच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना थेट मिळणाऱ्या आर्थिक अनुदानाबाबत विहित तांत्रिक कार्यपद्धती पूर्ण होताच स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे थेट बँक खात्यात आर्थिक मदत जमा केली जाईल, असेही या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. शासनाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या महाराष्ट्रातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### शासनाने जाहीर केलेल्या १२ प्रमुख सवलती व उपाययोजना

१. जमीन महसुलात 100 टक्के सूट: सर्व बाधित शेतकऱ्यांना जमीन महसुलात पूर्णपणे सूट देण्यात आली आहे.
२. पीक कर्जाचे पुनर्गठन: चालू हंगामातील थकीत पीक कर्जांचे मध्यम मुदतीच्या कर्जात रूपांतर करून पुनर्गठन केले जाईल.
३. शेती कर्जवसुलीस स्थगिती: बँका, सहकारी संस्थांकडून केल्या जाणाऱ्या शेतीशी निगडित सर्व प्रकारच्या कर्जवसुलीला तात्काळ स्थगिती.
४. कृषी पंपांच्या वीजबिलात सूट: 7.5 हॉर्सपावरपर्यंतच्या पंपांचे वीज बिल शासनाने अगोदरच माफ केले आहे. आता 7.5 HP पेक्षा जास्त क्षमतेच्या कृषी पंपांनाही चालू वीजबिलात विशेष सवलत लागू असेल.
५. परीक्षा शुल्क माफी: दुष्काळग्रस्त भागातील शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णतः माफ करण्यात आले आहे.
६. रोहयो कामांचे निकष शिथिल: शेतमजुरांच्या हाताला काम मिळावे यासाठी रोजगार हमी योजनेतील (MGNREGA) कामांचे निकष शिथिल करून मागणीनुसार नवीन कामे सुरू केली जातील.
७. पाण्यासाठी टँकर्सची सोय: पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणाऱ्या प्रत्येक गावासाठी आणि वाडी-वस्तीसाठी तत्काळ टँकरने पाणीपुरवठा केला जाईल.
८. कृषी पंपांची वीज न तोडण्याचे आदेश: वीजबिलाच्या थकबाकीपोटी टंचाईग्रस्त गावांमधील शेतकऱ्यांच्या शेतीपंपांची वीज जोडणी खंडित करण्यास पूर्ण मनाई करण्यात आली आहे.
९. अन्नधान्याची सुरक्षितता: शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची कोणतीही टंचाई भासू नये यासाठी विशेष वितरण व्यवस्था उभारली जाईल.
१०. चारा छावण्या व जनावरांसाठी चारा: जनावरांच्या चाऱ्याचा तुटवडा जाणवू नये म्हणून चारा उपलब्धता आणि नियोजनाची जबाबदारी स्थानिक प्रशासनावर सोपवण्यात आली आहे.
११. जलसंधारण कामांना गती: जलस्रोतांमधील भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर हाती घेतली जातील.
१२. पाण्याचे सूक्ष्म नियोजन: जनावरांसाठी आणि नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचे योग्य आरक्षण व नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## SIR मधून नाव वगळल्यास अधिकारी घरी जाऊन कागदपत्रे घेतील

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एसआयआर वरील वादाच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने शनिवारी दिल्लीतील निर्वचन भवन येथे एक बैठक घेतली. ज्या व्यक्तींची नावे एसआयआरमधून वगळण्यात आली आहेत, ते आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी अर्ज करू शकतील, असा निर्णय घेण्यात आला.

अर्ज केल्यानंतर, अधिकारी कागदपत्रे गोळा करण्यासाठी घरोघरी जातील. ही कागदपत्रे निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर अपलोड केली जातील आणि प्रादेशिक अधिकारी निर्णय घेतील. या बैठकीला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन्ही निवडणूक आयुक्त, डॉ. सुखबीर सिंग संधू व डॉ. विवेक जोशी उपस्थित होते.

निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेच्या तीन टप्प्यांमध्ये, 30 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मसुदा मतदार याद्यांमधून 133.7 दशलक्ष नावे वगळण्यात आली आहेत. हे प्रमाण एसआयआरपूर्वीच्या एकूण मतदारांच्या 14.1% आहे. दिल्लीत सर्वाधिक 32.8% मतदार वगळण्यात आले आहेत, त्याखालोखाल दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीवमध्ये 29.6%, तेलंगणामध्ये 21.7%, महाराष्ट्रात 21.1% आणि अंदमान आणि निकोबार बेटांमध्ये 20.6% मतदार वगळण्यात आले आहेत. बैठकीत निर्णय घेण्यात आला की, दिल्ली आणि महाराष्ट्रात दावा व हरकत दाखल करण्याची तारीख 30 ऑक्टोबर 2026 पर्यंत वाढवण्यात आली आहे. दिल्लीतील वादांचा निपटारा 30 नोव्हेंबरपर्यंत, तर महाराष्ट्रातील वादांचा निपटारा 10 नोव्हेंबरपर्यंत करावा लागेल. गोव्यात ज्या मतदारांची नावे वगळली गेली आहेत, तिथे ब्लॉक अधिकारी घरोघरी जाऊन फॉर्म-6 जमा करतील. SIRमध्ये तुमचे नाव यादीत नसेल किंवा वगळले गेले असेल, तर फॉर्म-6 द्वारे नाव समाविष्ट करण्याचा दावा करता येतो. आयोगाने सांगितले की, फॉर्म-6 वर कोणतीही हरकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने फॉर्म-6 कायम ठेवला आहे. फॉर्ममधील बदलाच्या वादासंदर्भात, निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर (SIR) साठीच्या फॉर्म 6 शी संबंधित घोषणा कायम ठेवली होती.




■ वादानंतर निवडणूक आयोगाचा निर्णय; आतापर्यंत १३.३७ कोटी नावे वगळली

## पुरंदर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर

### माजी आमदार संजय जगताप यांच्या पाठपुराव्याला यश





■ नाझरे सुपे (दै. संध्या)

खरीप हंगाम २०२६ मध्ये पावसाने मोठी ओढ दिल्याने संकटात सापडलेल्या पुरंदर तालुक्याला अखेर शासनाकडून दिलासा मिळाला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय क्रमांक समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ जाहीर करत राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या यादीत पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे.

कृषी आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात पुरंदरसह अनेक तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा खूपच कमी पर्जन्य झाल्याचे स्पष्ट झाले होते. दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार ही कारवाई करण्यात आली असून सह सचिव संजय इंगळे यांनी या आदेशावर स्वाक्षरी केली आहे.

दरम्यान, पुरंदर तालुक्यात तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून पिकांच्या नुकसानीची मदत स्वतंत्र आदेशाने जाहीर होणार आहे.

### जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

हा निर्णय जाहीर होताच पुरंदर-हवेलीचे माजी आमदार आणि भाजपा नेते संजय चंदुकाका जगताप यांनी शासनाचे आभार मानले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ते पुरंदर तालुका दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट करावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करत होते. सासवड, जेजुरी, वाल्हे, परिंचे, पांगारे, सोनोरी, सुपा, माहूर, वीर या भागात त्यांनी स्वतः जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावर पाहणी केली होती. सोयाबीन, मका, बाजरी, कांदा या पिकांचे झालेले नुकसान आणि पाणीटंचाईची विदारक परिस्थिती त्यांनी शासन दरबारी मांडली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

### तातडीने अंमलबजावणी करा - संजय जगताप

संजय जगताप म्हणाले, "शासनाने आमच्या मागणीची दखल घेऊन पुरंदरचा समावेश दुष्काळी यादीत केला त्याबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो. मात्र केवळ घोषणा करून थांबू नये. शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या बारा सवलतींची अंमलबजावणी तातडीने झाली पाहिजे, जेणेकरून बळीराजाला प्रत्यक्ष लाभ मिळेल."

### शासन निर्णयानुसार पुरंदर तालुक्यात पुढील सवलती लागू होणार आहेत.

१) जमीन महसूलात सूट २) पीक कर्जाचे पुनर्गठन ३) शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती ४) कृषी पंपाच्या चालू वीज बिलात सूट - ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या वीज पंपाचे बिल अगोदरच माफ आहे, त्यावरील क्षमतेच्या पंपांना ही सूट लागू असेल ५) शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी ६) रोजगार हमी योजने अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे ७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर ८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडित न करणे ९) शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी आणि मजुरांना अन्नधान्याची टंचाई भासणार नाही याची व्यवस्था करणे १०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध करून देणे ११) जलसंधारणाची कामे सुरू करणे १२) अगोदर निर्गमित केलेल्या शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे

# निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधूंचा मोर्चा

## *मुंबईत ४ ऑक्टोबरला मनसे-शिवसेनेचे संयुक्त आंदोलन; सर्वपक्षीय एकजुटीची हाक*

■ मुंबई (दै. संध्या)

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वादग्रस्त ठरलेल्या 'विशेष सघन पुनरीक्षण' (SIR) प्रक्रियेवरून आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यशैलीवरून देशभरात संतापाची लाट उसळलेली असतानाच, महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत ऐतिहासिक आणि राजकीय भूकंप घडवणारी घडामोड समोर आली आहे. निवडणूक आयोगाने मतदारांची घोर फसवणूक केल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकत्र येत निर्णायक संघर्षाचे रणशिंग फुंकले आहे. येत्या 4 ऑक्टोबर 2026 रोजी मुंबईत मनसे आणि शिवसेनेच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'जनमोर्चा' काढण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा राज ठाकरे यांनी सोशल मीडियाद्वारे केली आहे. दोन्ही ठाकरे बंधूंच्या संयुक्त स्वाक्षरीने/नावाने हे आवाहन समोर आल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.



आपल्या अधिकृत संदेशात राज ठाकरे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर थेट बोट ठेवले आहे. "देशातील सत्ताधारी पक्षाची जणू काही आपण एक शाखाच आहोत, अशा लाचार पद्धतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक आयोग वागत आहे. 'एसआयआर'च्या (SIR) नावाखाली कोट्यवधी मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळून जनतेची अक्षम्य फसवणूक करण्यात आली आहे." हा लढा केवळ राजकीय अस्तित्वाचा नसून देशातील लोकशाही, निष्पक्ष निवडणूक व्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान वाचवण्यासाठीचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या मोर्चाची व्याप्ती आणि राजकीय स्वरूप स्पष्ट करताना राज ठाकरे म्हणाले, "या मोर्चाच्या आयोजनात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेचा (UBT) पुढाकार असला, तरी हा कोणत्याही एका पक्षाचा मोर्चा नसून तमाम जनतेचा आक्रोश आहे. हा मोर्चा संपूर्ण राजकीय व्यवस्थेचा आणि सामान्य नागरिकांचा बुलंद आवाज ठरावा, यासाठी आम्ही राज्यातील सर्व विरोधी आणि समविचारी राजकीय पक्षांशी संवाद साधून त्यांना एकत्र आणणार आहोत."

महाराष्ट्रातील प्रत्येक सजग नागरिकाने आपल्या मतदानाच्या मूलभूत हक्काचे रक्षण करण्यासाठी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे भावनिक आवाहन दोन्ही नेत्यांनी केले आहे. या मोर्चाची अचूक वेळ आणि मुंबईतील मार्ग/ठिकाण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

# पुण्यात पोलिसाने गोळी झाडून घेत आयुष्य संपवलं

## PMPLच्या बस डेपोत आढळला मृतदेह; ३ दिवसांपासून होते बेपत्ता

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यात पिंपरी चिंचवड शहरात एका पोलिसाने गोळी झाडून घेत आयुष्य संपवल्याच्या घटनेनं खळबळ उडाली आहे. पिंपरी चिंचवड शहरात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असलेला पोलीस ३ दिवसांपासून बेपत्ता होता. रविवारी सकाळी त्यांचा मृतदेह पीएमपीएल बस डेपोत आढळून आला आहे. विजय कोळी असं पोलिसाचे नाव आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, पिंपरी चिंचवड शहरात पोलीस कॉन्स्टेबल विजय कोळी यांचा मृतदेह बस डेपोत आढलून आलाय. ट्रान्सपोर्टनगर असलेल्या भागात घडलेल्या या घटनेनंतर खळबळ उडाली आहे. गेल्या तीन दिवसांपासून विजय कोळी हे बेपत्ता होते. कुटुंबियांकडून त्यांचा शोध घेतला जात होता. आता त्यांनी आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे.

विजय कोळी यांनी कौटुंबिक वादातून टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आलीय. त्यांनी स्वत:च्या सर्विस रिव्हॉल्वरमधून गोळी झाडून घेत आयुष्य संपवलं.



शनिवारी सकाळी त्यांचा मृतदेह ट्रान्सपोर्ट नगर भागातल्या बस डेपोत आढळून आला. याची माहिती पोलिसांना देताच पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. विजय कोळी यांनी आत्महत्या कधी केली? का केली? याचा तपास आता निगडी पोलीस करत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जेजुरीत गणरायाचे विसर्जन; सार्वजनिक मंडळांचा डीजेच्या तालावर जल्लोष

**जेजुरी : दैनिक संध्या**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत अतिशय जल्लोषात गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.तर सार्वजनिक गणेश मंडळानी डीजेच्या तालावर जल्लोष केला. जेजुरी येथे आज सकाळ पासूनच ऐतिहासिक होळकर तलाव,नाझरे येथील मल्हार जलाशयात अतिशय धार्मिक वातावरणात घरोघरच्या श्री गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. सकाळ पासूनच जेजुरी शहरातील नागरिकांनी छोट्या मिरवणुका काढून विसर्जन ठिकाणी पूजा आरती करत आपल्या लाडक्या गणेशाचे अतिशय भावपूर्ण वातावरणात विसर्जन केले. भंडारा, गुलाल, फुलांची उधळण, फाटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. जेजुरी शहरात 48 ठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळानी गणेशाची प्रतिष्ठापना केली होती. गुरुवार व शुक्रवारी डी जे चा दणदणाट आणि तरुणाईचा जल्लोष पाहण्यास मिळाला. शुक्रवार दिनांक 25 रोजी अनंत चतुर्थी दिवशी सायंकाळी सात वाजता सार्वजनिक गणेश मंडळांच्या मिरवणुका सुरू झाल्या जननी मित्र मंडळाने पारंपरिक बॅण्ड च्या वादनात मिरवणूक काढली तर उर्वरित मंडळांत डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई जल्लोष करीत होती. या मिरवणुकीत राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीची काही वेळ कोंडी झाली होती. जेजुरी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला होता.

### कवठे येमाईत कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती उत्साहात साजरी होणार

**कवठे येमाई : दैनिक संध्या**



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी व पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंती सोहळ्याचे आयोजन न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, कवठे येमाई येथे करण्यात आले आहे. "शिक्षणातून समाज परिवर्तनाचा विचार रुजविणाऱ्या कर्मवीर यांना अभिवादन करण्यासाठी कवठे येमाई सज्ज! झाली असून सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विद्यालयाच्या परिसरात हा जयंती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रा. डॉ. डी. जी. हिंगणे (मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा) राहणार असून, मा. श्री. प्राचार्य किसनराव डी रत्नपारखी (जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच मा. डॉ. ज्ञानेश्वर थोरात (रयत सेवक, मंचर) हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. एस. डी. मुंजावडे यांच्या वतीने या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले असून, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ, माजी विद्यार्थी संघ, भौतिक विकास समिती, आजी-माजी सरपंच, उपसरपंच व सदस्य, समस्त ग्रामस्थ, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि सेवकवृंद यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांची भूमिका महत्त्वाची : प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**



राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच समाजसेवेची जाणीव निर्माण करणारे प्रभावी व्यासपीठ आहे. युवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेऊन समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे असे प्रतिपादन जिजामाता सीनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी केले. ते जातेगाव येथील जिजामाता सीनियर कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांची भूमिका या विषयावर आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. केशव उबाळे, महाविद्यालय परीक्षा अधिकारी प्रा. रुपाली रासकर, बीसीए विभाग प्रमुख प्रा. रोहिणी जऱ्हाड, बीसीएस विभाग प्रमुख प्रा. पूजा काळे आदी उपस्थित होते.

# चेक न वटल्याच्या खटल्यात नुकसान भरपाई व तुरुंगवास

## तब्बल सत्यान्नव लाख रूपये देण्याचा आदेश व तीन महिना तुरुंगवासाची शिक्षा

■ बारामती (दै. संध्या)



पुणे येथील मे.सिव्हिल जज्ज सीनियर डिव्हिजन व प्रमुख न्यायदंडाधिकारी श्री. आनंद एस.मुंढे साहेब यांनी आरोपी स्पंदन मेडिकेअर चे प्रोपरायटर श्री. जगदीश बाजीराव कदम रा. समर्थनगर, नवी सांगवी, पुणे यांना तारीख 21/9/2026 रोजी तुरुंगवास, नुकसानभरपाई रक्कम रुपये 97,00,000 फिर्यादीला देण्याचा आदेश दिला. फिर्यादी युनायटेड मेडिकल सोलूशन कंपनी तर्फे जयदीप दत्ताराम कुंभार, रा. वारजे. पुणे यांनी सदर खाजगी तक्रार कोर्टात दाखल केली होती.

आरोपी व फिर्यादी हे व्यावसायिक मित्र होते. फिर्यादी यांची मेडिकल व्यवसायासाठी लागणारी मशिनरी पुरवण्याची फर्म होती. आरोपीने वेळोवेळी अशी मशिनरी फिर्यादी कडून घेतली होती.परंतु त्याची परतफेडीची रक्कम वेळेत देता आली नव्हती.त्यामुळे त्याने त्यांच्या परतफेडीच्या पोटी रुपये 88,59,903 चा चेक फिर्यादी यांना लिहून व सही करून दिला व चेक वटेल अशी हमी दिली होती.फिर्यादीने तो चेक स्वतः च्या बँक खात्यावर भरला असता तो न वटता परत आला.त्यामुळे फिर्यादी यांनी अँड.विशाल विजयकुमार बर्गे रा.बारामती यांच्या मार्फत फौजदारी खटला पुणे कोर्टात दाखल केला होता. आरोपीने असा बचाव घेतला होता की,फिर्यादी याला सदर रक्कमेची परतफेड करून रक्कम दिलेली आहे.परंतु मुद्दाम पैसे उकळण्याच्या उद्देशाने हा खोटा खटला दाखल केला आहे. फिर्यादी तर्फे ॲड विशाल बर्गे यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले की, चेकबाबत फिर्यादी गैरवापर करू नये म्हणुन आरोपीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही अथवा त्याच्या बँकेत जाऊन चेक बाबत स्टॉप पेमेंट केले नाही.तसेच वकिलांच्या नोटिशीला तत्काळ उत्तर देऊन स्वताची बाजू मांडली नाही. आरोपीने चेक वरील सही नाकारली नाही.या युक्तिवादाच्या समर्थनार्थ सर्वोच्च न्यायालयाचे निकाल फिर्यादीचे वकील श्री ॲड.विशाल बर्गे यांनी कोर्टात सादर केले. हा ॲड.विशाल बर्गे यांचा युक्तिवाद मान्य करून मे कोर्टाने आरोपीस तुरूंगवास,दंड तसेच नुकसान भरपाई देण्याचा आदेश तारीख 21/9/2026 रोजी दिला आहे.

## निंबुतमधील तीन शेतकऱ्यांच्या विद्युत केबल चोरी

■ निंबूत (दै. संध्या)

अस्मानी संकटामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत आता विद्युत केबल चोरीच्या घटनांनी भर पडली आहे. निंबूत परिसरातील तीन शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्या केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना समोर आली असून, त्यामुळे शेतीला पाणी देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.निंबूत परिसरात गेल्या काही वर्षांपासून विद्युत मोटार पंप व केबल चोरीच्या घटना घडत असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.चोरी झाल्यानंतर नवीन केबल व विद्युत साहित्य खरेदी करण्याचा अतिरिक्त आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडत असून,आधीच शेतीमालाला मिळणारे दर,वाढता उत्पादन खर्च आणि नैसर्गिक संकटांमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे ठाकले आहे.यापूर्वी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील तसेच करंजे पूल पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे यांनी विद्युत पंप व केबल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते.त्यावेळी काही चोरीच्या घटनांचा तपास करून संशयित आरोपींची नावे निष्पन्न झाली होती.काही गुन्हे उघडकीस आल्याने संबंधित शेतकऱ्यांना दिलासाही मिळाला होता.मात्र,गेल्या दोन-तीन महिन्यांपासून पुन्हा अशा चोरीच्या घटना वाढत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.त्यामुळे पोलिसांनी या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन चोरीच्या घटनांचा सखोल तपास करावा,यापूर्वीच्या प्रकरणांतील तपासाची माहिती घेऊन चोरट्यांचा माग काढावा आणि चोरीला गेलेले विद्युत पंप व केबल शोधून संबंधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा,अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## सिद्धाली शहा यांचा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते विशेष सन्मान

■ बारामती (दै. संध्या)



'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स'कडून 'जगातील सर्वात तरुण नगरसेविका' म्हणून नामांकन मिळवून जागतिक विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल फलटण नगरपरिषदेच्या नगरसेविका कु. सिद्धाली अनुप शहा यांचा राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या हस्ते नुकताच विशेष सन्मान केला. बारामती येथील 'सहयोग' निवासस्थानी हा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांनी कु. सिद्धाली शहा यांच्याशी संवाद साधत त्यांच्या आतापर्यंतच्या राजकीय व सामाजिक कार्याची सविस्तर माहिती जाणून घेतली. अत्यंत कमी वयात नगरसेविका पदाची जबाबदारी स्वीकारून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत जागतिक विक्रमाची नोंद केल्याबद्दल त्यांनी सिद्धाली शहा यांचे विशेष कौतुक केले. महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी, "फलटण शहरातील महिलांसाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे आणि तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी पुढाकार घ्या," असे आवाहन केले. तसेच महिलांच्या विकासासाठी आणि त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगत त्यांनी "महिलांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी पुढाकार घेऊन काम करा. राज्य शासन नेहमीच महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," असे आश्वासन दिले.

राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांकडून झालेला हा विशेष सन्मान आणि मिळालेले मार्गदर्शन यामुळे कु. सिद्धाली शहा यांच्या समाजाभिमुख कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, भविष्यात महिला सक्षमीकरणासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

## बारामती कृषीच्या विद्यार्थ्यांची बास्केटबॉलमध्ये सुवर्ण झेप!

### आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत मुलांच्या संघाचे विजेतेपद; आयुष क्षीरसागर उत्कृष्ट खेळाडू

■ बारामती (दै. संध्या)



ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित, शारदानगर (ता.बारामती) येथील डॉ.शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या मुलांच्या बास्केटबॉल संघाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावून विजेतेपद मिळविले.

संदीप फाउंडेशन कृषी महाविद्यालय, महीरवाणी नाशिक येथे झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून दहा संघ सहभागी झाले होते. बारामती कृषी महाविद्यालयाच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत दमदार सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे माजी अधिष्ठाता डॉ.जे बी भाकरे,विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.विलास आवारी हे उपस्थित होते.बास्केटबॉल मुलांच्या संघातील आयुष क्षीरसागर याची उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. विजेत्या संघात सचिन उसारे,आयुष क्षीरसागर, शुभम विजापूरे,दिग्विजय चव्हाण, वेदांत लुमदे,माधव शिंदे,ऋषी निंबोरे,विराज पाटील,अपूर्व नालवडे,विक्रम चौगुले,आदित्य पाटील व अमन जाधव यांचा समावेश आहे. या संघाला क्रीडा शिक्षक प्रा. दत्तात्रय आदलिंगे व श्री.जय शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले,तर प्रा.जे.के.क्षीरसागर यांनी संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी पार पाडली. या यशाबद्दल ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन श्री.राजेंद्र पवार,विश्वस्त सौ.सुनंदा पवार,समन्वयक प्रा.ए.बी.रासकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.डी.गोंडे,उपप्राचार्य एस.पी.गायकवाड तसेच कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्या ए.डी.भोईटे यांनी विजेत्या खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले आणि आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## शिरूरच्या अमित घावटेंची राष्ट्रीय स्तरावर कामगिरी

■ शिरूर (दै. संध्या)




■ दिल्लीतील एएनटीएफ परिषदेत फरारी गुन्हेगारांच्या हद्दपारीवर मार्गदर्शन

शिरूरचे सुपुत्र तथा २००८ बॅचचे भारतीय महसूल सेवा (IRS) अधिकारी अमित फक्कडराव घावटे यांनी दिल्ली येथे झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (ANTF) परिषदेत आंतरराष्ट्रीय फरारी गुन्हेगारांच्या हद्दपारी या विषयावर सत्र घेत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, राष्ट्रीय स्तरावरील या परिषदेत सलग दुसऱ्या वर्षी त्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. अमित घावटे हे सध्या नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB), मुंबई येथे अतिरिक्त संचालक म्हणून कार्यरत आहेत. गुप्तचर व आर्थिक तपास क्षेत्रातील त्यांना १२ वर्षांहून अधिक काळाचा अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी DGCEI, SIIB, CGST आणि SFIO यांसारख्या महत्त्वाच्या केंद्रीय संस्थांमध्ये काम केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल २०२२ मध्ये NCB महासंचालक पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला आहे. दिल्लीतील या राष्ट्रीय परिषदेला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय गृह सचिव, तसेच विविध राज्यांचे पोलीस महासंचालक उपस्थित होते. अशा राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठावर अमित घावटे यांनी फरारी गुन्हेगारांच्या हद्दपारीसंदर्भातील विषयावर मार्गदर्शन केल्याने शिरूरच्या शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# रोटरी क्लब ऑफ बारामतीतर्फे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या पुस्तकांचे वाटप

**डॉ.गौतम राजे यांच्याकडून वडील डॉ.रवींद्र राजे यांच्या सन्मानार्थ एक लाख रुपयांची देणगी**

■ बारामती (दै. संध्या)




रोटरी क्लब ऑफ बारामतीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांतर्गत बारामती तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.पंचायत समिती,बारामती येथील सभागृहात आयोजित या कार्यक्रमात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिष्यवृत्ती सराव परीक्षा (NMMS) संदर्भातील सुमारे ३०० संच पुस्तके उपलब्ध करून देण्यात आले. NMMS परीक्षेच्या तयारीसाठी सराव संच,मागील प्रश्नपत्रिका व विविध विषयांचे अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांच्या तयारीत महत्त्वाची भूमिका बजावते.ही पुस्तके विनामूल्य उपलब्ध करून दिल्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना महत्त्वाचे शैक्षणिक साहित्य कोणताही आर्थिक भार न घेता मिळणार असून,त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच हातभार लागणार आहे.

या उपक्रमासाठी डॉ.गौतम राजे यांनी त्यांचे वडील डॉ.रवींद्र.प.राजे यांच्या सन्मानार्थ एक लाख रुपयांची देणगी रोटरी क्लब ऑफ बारामतीला दिली. रोटरी क्लबच्या माध्यमातून या देणगीचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी योग्य पद्धतीने विनियोग करण्यात आला.

यावेळी बोलताना रोटरी क्लब ऑफ बारामतीचे अध्यक्ष अतुल गांधी म्हणाले की,रोटरी क्लबच्या माध्यमातून विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविले जात असून,दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे त्याचा लाभ गरजू विद्यार्थ्यांना मिळत आहे.या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी मोठी मदत होणार असून, त्यांच्या भविष्यातील यशाला निश्चितच हातभार लागेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.डॉ.गौतम राजे हे लंडनहून विशेषतः बारामतीस येऊन या कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी त्यांचे विशेष आभार मानले.तसेच पंचायत समितीच्या माध्यमातून सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल सभापती किरण तावरे यांचेही आभार मानले.

सभापती किरण तावरे यांनी रोटरी क्लबच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. रोटरी क्लब बारामती परिसरातील शाळांना विविध माध्यमातून मदत करण्याबरोबरच यापूर्वी बारामतीतील दवाखाने व आरोग्य क्षेत्रालाही सामाजिक भावनेतून मोठ्या प्रमाणात मदत करत आला आहे,असे त्यांनी नमूद केले.

डॉ. गौतम राजे यांनी आपल्या वडिलांच्या सन्मानार्थ दिलेल्या देणगीचा रोटरी क्लबने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी अतिशय योग्य व नियोजनबद्ध पद्धतीने उपयोग केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने सुरू राहावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास बारामती तालुक्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.रोटरी क्लबच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांना तसेच संबंधित शाळांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या सरावासाठी पुस्तके वितरित करण्यात आली.

या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ बारामतीचे अध्यक्ष अतुल गांधी,सचिव हर्षवर्धन पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.या प्रकल्पासाठी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ अंतर्गत इकॉनॉमिक अँड कम्युनिटी डेव्हलपमेंटचे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर इंदापूरचे रो.वसंतराव माळुंजकर यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य दरेकर सर यांनी केले,तर आभार रो.ॲड. अक्षय महाडिक यांनी मानले.

यावेळी रो.अभिजीत बर्गे, रो. अलीअसगर बारामतीवाला, रो.निखिल मुथा, रो.मेहुल दोषी, रो. दत्ताजी बोराडे, रो.अरविंद गरगटे, रो.प्रफुल्लजी गादिया, अंजली गांधी, प्रीती पाटील, प्रियांका बर्गे यांच्यासह रोटरी क्लबचे पदाधिकारी,सदस्य,मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. "शिक्षणातून सक्षम समाज आणि सक्षम समाजातून उज्वल भविष्य" या भावनेतून रोटरी क्लब ऑफ बारामतीचा शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### एचडीएफसी अर्गो आयोजित ११ व्या इन्श्युरन्स क्विझ ज्युनियरची सांगता

**पुणे : दैनिक संध्या**

एचडीएफसी अर्गो जनरल इन्श्युरन्स या भारतातील आघाडीच्या सर्वसाधारण विमा क्षेत्रातील कंपनी तर्फे त्यांच्या इन्श्युरन्स क्विझ ज्युनियर २०२६ च्या ११ व्या पर्वाचे यशस्वी आयोजन केले होते, भारतातील मुलांमध्ये वित्तीय साक्षरता वाढीस लागावी या हेतूने या महत्त्वपूर्ण अशा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वर्षी या उपक्रमा मध्ये १,१०० हून अधिक शहरांतील तसेच देशभरांतील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतून आलेले १६,९०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्यायोगे हा कार्यक्रम देशभरांतील विम्याची जागरुकता निर्माण करणाऱ्या उपक्रमांसह सर्वांत मोठी पोहोच असलेल्या शालेय उपक्रमांपैकी एक ठरला आहे. एचडीएफसी अर्गो तर्फे देशभरात विम्याचा प्रसार वाढीस लागावा या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून दि इन्श्युरन्स क्विझ ज्युनियर च्या माध्यमातून पुढील पिढीत लहान वयापासूनच विम्याचा प्रसार करण्यावर लक्ष केंद्रित केले जात असून एकूणच शाळेतील ८ व ९ वीत शिकणाऱ्या देशभरांतील शाळांमध्ये हा उपक्रम सुरु करण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात ही २०१६ मध्ये केवळ एक शहर आणि १८ शाळांपासून करण्यात आली आणि आजमितीस एका दशकाच्या कालावधीत ३ दशलक्ष विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच निर्माण झाल्याने देशभरांतील जवळजवळ तीन चतुर्थांश जिल्ह्यांमध्ये ही पोहोच निर्माण झाली आहे. हा क्विझ म्हणजे भारत हा वित्तीय दृष्ट्या सुशिक्षित होऊन लहान वयात मुलांना ज्ञान आणि आत्मविश्वास देऊन ते भविष्यासाठी योग्य निर्णय घेण्यास सक्षम करण्यावर कंपनीच्या योजनेचा एक भाग आहे. अतिशय अटीतटीच्या अशा या अंतिम सामन्यात मध्यप्रदेशातील भेल येथील जवाहरलाल नेहरु स्कूल च्या मेधांश देवळे आणि तन्वी शुक्ला यांनी या वर्षीचा पुरस्कार जिंकला. तसेच त्यांच्याशी अगदी अटीतटीच्या सामन्यात केरळच्या भवन्स विद्यामंदीर चे डिलियन डॉन आणि प्रणव संतोष हे पहिले तर महाराष्ट्रातील कल्याणी स्कूल चे आलिशा जैन आणि आयुष झा हे दुसरे उपविजेते ठरले. विजेत्यांना २,२५,००० रुपयांच्या रोख पुरस्काराने गौरवण्यात आले तर पहिल्या उपविजेत्यांना रु, १,५०,००० तर दुसऱ्या उपविजेत्यांना रु. ७५,००० च्या रोख पुरस्काराने गौरवण्यात आले. अंतिम फेरीत प्रवेश करणाऱ्या अन्य शाळांमध्ये सनबीम इंग्लिश स्कूल, उत्तर प्रदेश, सनबीम लहारंत्रा, उत्तर प्रदेश आणि दिल्ली पब्लिक स्कूल पारादीप रिफायनरी, ओडिशा यांचा समावेश होता.

### संभवामि युगे युगेचा प्रत्ययकारी प्रयोगाला हाऊसफुल प्रतिसाद

**पुणे : दैनिक संध्या**

श्रीकृष्णचरित्राचे, या चरित्रातील विविध प्रसंगांचे दर्शन नृत्य-नाट्याच्या माध्यमातून घडविणारे संभवामि युगे युगे हे अतिशय प्रत्ययकारी सादरीकरण बुधवारी रसिकांच्या हाऊसफुल्ल गर्दीत सादर झाले आणि पूर्णपुरुष मानले जाणाऱ्या या अवतारकार्याचे सर्वश्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध झाले. पुणे फेस्टिव्हल अंतर्गत संस्कृती बालगुडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेले, त्यांनीच दिग्दर्शित तसेच अभिनित केलेले संभवामि युगे युगे हे नृत्यनाट्य यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भरगच्च प्रेक्षागृहाने अक्षरशः डोक्यावर घेतले. पायात व्याधबाण घुसलेला श्रीकृष्ण स्वतःच आपल्या अवतारकार्याची प्रेरणा, आवश्यकता आणि अपरिहार्यता प्रेक्षकांसमोर ठेवतो, या प्रसंगातून सुरू झालेले हे नृत्यनाट्य फ्लॅशबॅक तंत्राने बालकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे दर्शन घडवत कंसवध, राधेसोबतचे हळवे, नाजुक क्षण दर्शवत योगेश्वर श्रीकृष्णापर्यंतचा प्रवास सांगणारे होते. द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग, कृष्णशिष्टाई अयशस्वी होणे, युद्धाचा निर्णय, गीतोपदेश, भीष्म-द्रोण-कर्ण-दुर्योधनवधाचे प्रसंग, गांधारीचा शाप आणि यादवांचा वंशनाश असे टप्पे घेत पुन्हा पायात बाण घुसलेल्या श्रीकृष्णापर्यंत वर्तुळ पूर्ण करताना प्रेक्षक भारावून गेले होते. पण ते तिथेच थांबले नाही. तर यदा यदा हि धर्मस्य...या वचनाची पूर्तता करण्यासाठी मी पुन्हा अवतार धारण करेन, इथपर्यंत प्रेक्षकांना घेऊन गेले. मानवी जीवनातील आशानिराशा, महत्त्वाकांक्षा, सत्तालालसा, कुटीलता, नैतिक अनैतिकतेचे अर्थ, जय पराजयाच्या संकल्पना...सगळ्यांचे काल व परिस्थितीसापेक्ष विश्लेषण मांडणारे हे नृत्यनाट्य प्रेक्षकांना अंतर्मुख करणारेही होते. या प्रयोगाला पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू, पुणे पुस्तक महोत्सवाचे राजेश पांडे, संजय बालगुडे, संजीवनी बालगुडे, सचिन साळुंके, सचिन आडेकर, अतुल गोंजारी, श्रीकांत कांबळे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. नृत्यनाट्यातील सर्व कलाकार, तंत्रज्ञ, मदतनीसांचा या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये सहनिर्माते केदार सोमण, सूत्रधार व निर्मिती व्यवस्थापक निखिल निगडे, संगीत दिग्दर्शक तन्मय भिडे व ऋतुराज साठे, संगीत संयोजक विवेक वनारसे, प्रकाश योजनाकार तेजस देवधर, केशभूषाकार शीतल पळसांडे, नृत्यनाट्याच्या दिग्दर्शक व नृत्यदिग्दर्शक तसेच संकल्पना, सहनिर्मात्या, प्रमुख अभिनेत्री संस्कृती बालगुडे, विद्या दिढे, रिचा बापट, तितली घोटक, नक्षत्रा कुलकर्णी, स्पृहा कुलकर्णी यांचा समावेश होता. संस्कृती बालगुडे म्हणाल्या, 'या हाऊसफुल प्रतिसादाबद्दल मनापासून आभार व्यक्त करते. या प्रयोगाचे यश प्रेक्षकांच्या प्रतिसादावरच अवलंबून आहे कारण भरतनाट्यम नृत्यशैलीच्या माध्यमातून सादर होणारे हे नृत्यनाट्य आहे. पण याची रचना कल्पकतेने केल्याने ते छोट्यांना आणि मोठ्यांनाही सहज समजणारे आहे. कार्यक्रमास प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

### एएसके प्रायव्हेट वेल्थला अधिकृत व्यावसायिक भागीदार म्हणून सहभागी करून घेतले आहे

**पुणे : दैनिक संध्या**

मिरे ॲसेट शेअरखानने प्रायव्हेट वेल्थसोबत एक ऐतिहासिक धोरणात्मक भागीदारी जाहीर केली आहे. या भागीदारीतून दोन संस्था एकत्र येऊन विशेष तज्ज्ञता आणि उत्कृष्ट अंमलबजावणीद्वारे ग्राहकांना अपवादात्मक मूल्य देण्यास कटिबद्ध आहेत. एएसके प्रायव्हेट वेल्थ ही मिरे ॲसेट शेअरखानच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'प्रिमियर वेल्थ पार्टनर' श्रेणी अंतर्गत ऑनबोर्ड होणारी पहिली संस्था आहे. या उपक्रमाद्वारे कंपनी भारतातील अग्रगण्य वेल्थ मॅनेजर्स आणि वित्तीय संस्थांसोबत भागीदारी करण्याचे उद्दिष्ट ठेवते. तसेच, वेगळेपण असलेले वेल्थ ॲडव्हाइस आणि रिलेशनशिप मॅनेजमेंट प्रदान करण्यावर सातत्याने लक्ष केंद्रित करणार आहे. वित्तीय सेवा उद्योगात मूलभूत बदल होत असताना, ग्राहकांना आता एकात्मिक अनुभवाची अपेक्षा वाढत आहे—ज्यामध्ये विश्वासार्ह सल्ला, अखंड अंमलबजावणी, डिजिटल सोय, ऑपरेशनल उत्कृष्टता आणि त्यांच्या वेल्थ क्रिएशन प्रवासात सर्वसमावेशक सहाय्य यांचा समावेश आहे. ही भागीदारी एएसके प्रायव्हेट वेल्थच्या संपन्न आणि उच्च-नेट-वर्थ ग्राहकांना सल्ला देण्यातील सिद्ध उत्कृष्टतेला मिरे ॲसेट शेअरखानच्या मजबूत ब्रोकिंग प्लॅटफॉर्म, प्रगत तंत्रज्ञान, संशोधन क्षमता आणि ऑपरेशनल शिस्त यांच्याशी जोडते.

# २०३२ च्या यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिपचे यजमानपद

**■ पुणे(दै. संध्या)**

भारताला प्रथमच सायकलिंगमधील जागतिक प्रतिष्ठेची यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप २०३२ आयोजित करण्याचा मान मिळाला असून, या स्पर्धेचे यजमानपद पुण्याला मिळाले आहे. महाराष्ट्र आणि देशाच्या क्रीडा क्षेत्रातील महत्त्वाकांक्षांसाठी हा ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. महाराष्ट्र सरकार आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांनी भारत सरकारच्या सहकार्याने संयुक्तपणे ही उमेदवारी सादर केली. पुण्याला जागतिक सायकलिंग केंद्र म्हणून विकसित करण्यासोबतच पुणे जिल्हा, महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतात सायकलिंगचा दीर्घकालीन वारसा निर्माण करण्याच्या सामायिक दृष्टिकोनातून ही उमेदवारी उभारण्यात आली होती.

### जागतिक सायकलिंगमधील प्रतिष्ठेची स्पर्धा

यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप ही आंतरराष्ट्रीय सायकलिंग दिनदर्शिकेतील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या स्पर्धांपैकी एक असून, जगातील आघाडीचे सायकलपटू प्रतिष्ठेच्या रेनबो जर्सीसाठी या स्पर्धेत सहभागी होतात. २०२५ मध्ये रवांडाची राजधानी किगाली येथे झालेल्या स्पर्धेत ११३ देशांतील ७३४ सायकलपटूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेला सुमारे २० लाख प्रेक्षक उपस्थित होते, तर जगभरातील दूरचित्रवाणी प्रेक्षकसंख्या सुमारे ३० कोटी होती. पाच खंडांतील ३०८ माध्यम प्रतिनिधींनी या स्पर्धेचे वार्तांकन केले.



भारताच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीच्या दृष्टीनेही ही घोषणा महत्त्वपूर्ण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद मिळविण्याची भारताची महत्त्वाकांक्षा व्यक्त केली असून, क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करणे, गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि जागतिक क्रीडा महासत्ता म्हणून भारताची क्षमता विकसित करण्यावर भर दिला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ मध्येही भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनविण्यासाठी तसेच २०३६ च्या ऑलिम्पिकसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सक्षम बनविण्याचा रोडमॅप मांडण्यात आला आहे.

पुण्याच्या उमेदवारीचे अंतिम सादरीकरण झाल्यानंतर कॅनडातील मॉन्ट्रियल येथे झालेल्या यूसीआय काँग्रेसमध्ये या निर्णयाची घोषणा करण्यात आली. पुण्याच्या उमेदवारीच्या समर्थनासाठी महाराष्ट्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी मॉन्ट्रियल येथे उपस्थित होते. या शिष्टमंडळात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, क्रीडा व युवक सेवा आयुक्त दीपक सिंगला, उपमुख्यमंत्री व क्रीडामंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव मनिंदर पाल सिंग आणि एशियन सायकलिंग कॉन्फेडरेशनचे माजी महासचिव ओंकार सिंग यांचा समावेश होता.

उमेदवारीच्या प्रक्रियेत भारतातील पुणे आणि नेदरलँड्समधील ग्रोनिंगेन/ड्रेंथे यांच्यात अंतिम लढत झाली. कोलंबिया आणि मेक्सिको हे स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर ही दोन शहरे अंतिम फेरीत पोहोचली. ४ ते ६ सप्टेंबरदरम्यान तीन सदस्यीय यूसीआय तपासणी पथकाने पुण्याला भेट देऊन बालेवाडी स्टेडियम, पुणे विद्यापीठ परिसरासह प्रस्तावित स्पर्धा मार्ग आणि पायाभूत सुविधांची पाहणी केली होती. २०२६ च्या यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिपदरम्यान मॉन्ट्रियल येथे दोन्ही अंतिम उमेदवारांनी आपली सादरीकरणे केली. पुण्याची उमेदवारी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव मनिंदर पाल सिंग यांनी सादर केली. त्यांनी शहराची तयारी, क्षमता आणि २०३२ च्या स्पर्धेसाठीची दीर्घकालीन योजना मांडली. या यशामुळे जगातील आघाडीचे रोड सायकलपटू भारतात येणार असून, पुणे आणि महाराष्ट्राला क्रीडा क्षमता, पायाभूत सुविधा, निसर्गरम्य परिसर, संस्कृती आणि विकसित होत असलेली सायकलिंग परिसंस्था जगासमोर मांडण्यासाठी अभूतपूर्व जागतिक व्यासपीठ मिळणार आहे.

भारतासाठी हे यश जागतिक सायकलिंग समुदायाला देशात आणण्याबरोबरच खेळाडू विकास, पायाभूत सुविधा, सहभाग आणि क्रीडा क्षेत्रातील कौशल्यविकासासाठी दीर्घकालीन व्यासपीठ निर्माण करण्याची संधी आहे. भारताची उमेदवारी देशातील मोठा सायकलिंग आधार, तळागाळातील वाढती चळवळ, यूसीआयच्या स्पर्धांचे आयोजन करण्याचा अनुभव आणि तळागाळापासून उच्चस्तरीय सायकलिंगपर्यंत मजबूत मार्गिका विकसित करण्याच्या महत्त्वाकांक्षेवर आधारित होती.

पुण्याच्या यशस्वी उमेदवारीमागे आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाचा वाढता अनुभव असून, विशेषतः बजाज पुणे ग्रँड टूरमधून मिळालेला अनुभव महत्त्वाचा ठरला आहे. यूसीआय २.२ श्रेणीतील या स्टेज रेसमुळे आंतरराष्ट्रीय रोड सायकलिंग स्पर्धा आयोजित करण्याची पुण्याची क्षमता सिद्ध झाली आहे. महाराष्ट्र सरकार आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाने सरकारी संस्था, क्रीडा संघटना आणि शहरासाठीच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाच्या आधारावर संयुक्तपणे ही उमेदवारी तयार केली. मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि कार्यप्रणाली विकसित करण्यामध्ये राज्य व जिल्हास्तरीय संस्थांचा थेट सहभाग असल्याचे उमेदवारीच्या सादरीकरणातून अधोरेखित करण्यात आले.

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वरिष्ठ प्रतिनिधींसह यूसीआयच्या शिष्टमंडळाने उमेदवारी प्रक्रियेचा भाग म्हणून पुण्याची सविस्तर पाहणी केली. यामध्ये बालेवाडी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्रस्तावित अधिकृत हॉटेल्स, स्पर्धेची ठिकाणे, प्रारंभ व अंतिम ठिकाणे, स्पर्धा मार्ग आणि अन्य कार्यप्रणालींची पाहणी करण्यात आली. बजाज पुणे ग्रँड टूरसाठी विकसित व यशस्वीपणे वापरण्यात आलेले मार्गही शिष्टमंडळासमोर सादर करण्यात आले. प्रत्यक्ष रेस काफिला आणि कार्यप्रणालीचा वापर करून हे मार्ग दाखविण्यात आले. २०२६ च्या पुणे ग्रँड टूरने प्रत्यक्ष स्पर्धेच्या परिस्थितीत आयोजनाची क्षमता सिद्ध केली. या स्पर्धेसाठी २५ हून अधिक सरकारी विभागांमध्ये समन्वय साधण्यात आला आणि ४३७ किलोमीटरचे रस्ते रेससाठी सज्ज करण्यात आले. २०३२ मध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिप होईपर्यंत पुण्याला सहा वर्षांचा ग्रँड टूरचा अनुभव मिळेल, असा उमेदवारीचा आराखडा आहे.

यूसीआयचे अध्यक्ष डेव्हिड लापार्तिएंत म्हणाले: "पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यूसीआय व्यवस्थापन समितीसमोर सादर केलेला बजाज पुणे ग्रँड टूरचा अहवाल अत्यंत उत्साहवर्धक आहे. ज्या नव्या प्रदेशांमध्ये सायकलिंगला प्रमुख क्रीडा प्रकार बनण्याची क्षमता आहे, त्या प्रदेशांमध्ये या खेळाचा विस्तार होत आहे. महत्त्वाच्या भागीदारांचा सहभाग आणि उत्साह पाहता भारतात सायकलिंगचे भविष्य उज्ज्वल आहे."

# 'शिवराज्य – एका नव्या युगाची सुरुवात', प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद



**■ पुणे (दै. संध्या)**

पुणे फेस्टिव्हलमध्ये ओम डान्स अकॅडमीच्या विद्यार्थांने 'शिवराज्य – एका नव्या युगाची सुरुवात' हा नृत्यनाट्य कलाप्रकार बुधवार दि. २३ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये १२ नृत्यरचना होत्या. संस्थेचे ९० विद्यार्थी कलावंत यामध्ये सहभागी झाले होते. याची संकल्पना आणि नृत्यदिग्दर्शन ओम डान्स अकॅडमीचे ओमकार शिंदे यांनी केली होती. सादरीकरण चेतन चावडा यांनी केले होते.

शिवरायांचा इतिहास, नृत्य, अभिनय, संवाद, संगीत आणि थरारक सादरीकरणातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. आजच्या काळात डी.जे. लावून, धिंगाणा घालत सादर होणारी शिवजयंतीवर भाष्य करणारे आणि बहिर्जी नाईक, जिजामाता आणि आजचा कार्यकर्ता यांच्या संभाषणातून छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे शौर्य, धैर्य, युद्ध आणि नीती उलगडत जातात.

शिवजन्मोत्सव ते शिवराज्याभिषेक सोहळा अशा १२ नृत्यांचे सादरीकरण यातून केले गेले. अंगावर शहारे आणणारे स्टंटस, अभिमान वाटावे असे क्षण, डोळ्यात अश्रू आणणारे प्रसंग, टाळ्या घेणारे आणि हसवणारे संवाद असा सर्व रंगांनी भरलेला कार्यक्रम होता.

याचे समन्वयक ओमकार शिंदे होते. या प्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू यांनी कलावंतांचे सत्कार केले. संयोजन समिती सदस्य श्रीकांत कांबळे, अतुल गोंजारी, सचिन आडेकर यावेळी उपस्थिती होती.

# संसंभवामि युगे युगेचा प्रत्ययकारी प्रयोगाला हाऊसफुल प्रतिसाद

**■ पुणे (दै. संध्या)**

श्रीकृष्णचरित्राचे, या चरित्रातील विविध प्रसंगांचे दर्शन नृत्य-नाट्याच्या माध्यमातून घडविणारे संभवामि युगे युगे हे अतिशय प्रत्ययकारी सादरीकरण बुधवारी रसिकांच्या हाऊसफुल्ल गर्दीत सादर झाले आणि पूर्णपुरुष मानले जाणाऱ्या या अवतारकार्याचे सर्वश्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध झाले.

पुणे फेस्टिव्हल अंतर्गत संस्कृती बालगुडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेले, त्यांनीच दिग्दर्शित तसेच अभिनित केलेले संभवामि युगे युगे हे नृत्यनाट्य यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भरगच्च प्रेक्षागृहाने अक्षरशः डोक्यावर घेतले. पायात व्याधबाण घुसलेला श्रीकृष्ण स्वतःच आपल्या अवतारकार्याची प्रेरणा, आवश्यकता आणि अपरिहार्यता प्रेक्षकांसमोर ठेवतो, या प्रसंगातून सुरू झालेले हे नृत्यनाट्य फ्लॅशबॅक तंत्राने बालकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे दर्शन घडवत कंसवध, राधेसोबतचे हळवे, नाजुक क्षण दर्शवत योगेश्वर श्रीकृष्णापर्यंतचा प्रवास सांगणारे होते. द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग, कृष्णशिष्टाई अयशस्वी होणे, युद्धाचा निर्णय, गीतोपदेश, भीष्म-द्रोण-कर्ण-दुर्योधनवधाचे प्रसंग, गांधारीचा शाप आणि यादवांचा वंशनाश असे टप्पे घेत पुन्हा पायात बाण घुसलेल्या श्रीकृष्णापर्यंत वर्तुळ पूर्ण करताना प्रेक्षक भारावून गेले होते.

पण ते तिथेच थांबले नाही. तर यदा यदा हि धर्मस्य...या वचनाची पूर्तता करण्यासाठी मी पुन्हा अवतार धारण करेन, इथपर्यंत प्रेक्षकांना घेऊन गेले. मानवी जीवनातील आशानिराशा, महत्त्वाकांक्षा, सत्तालालसा, कुटीलता, नैतिक अनैतिकतेचे अर्थ, जय पराजयाच्या संकल्पना...सगळ्यांचे काल व परिस्थितीसापेक्ष विश्लेषण मांडणारे हे नृत्यनाट्य प्रेक्षकांना अंतर्मुख करणारेही होते.

या प्रयोगाला पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू, पुणे पुस्तक महोत्सवाचे राजेश पांडे, संजय बालगुडे, संजीवनी बालगुडे, सचिन साळुंके, सचिन आडेकर, अतुल गोंजारी, श्रीकांत कांबळे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. नृत्यनाट्यातील सर्व कलाकार, तंत्रज्ञ, मदतनीसांचा या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये सहनिर्माते केदार सोमण, सूत्रधार व निर्मिती व्यवस्थापक निखिल निगडे, संगीत दिग्दर्शक तन्मय भिडे व ऋतुराज साठे, संगीत संयोजक विवेक वनारसे, प्रकाश योजनाकार तेजस देवधर, केशभूषाकार शीतल पळसांडे, नृत्यनाट्याच्या दिग्दर्शक व नृत्यदिग्दर्शक तसेच संकल्पना, सहनिर्मात्या, प्रमुख अभिनेत्री संस्कृती बालगुडे, विद्या दिढे, रिचा बापट, तितली घोटक, नक्षत्रा कुलकर्णी, स्पृहा कुलकर्णी यांचा समावेश होता. संस्कृती बालगुडे म्हणाल्या, 'या हाऊसफुल प्रतिसादाबद्दल मनापासून आभार व्यक्त करते. या प्रयोगाचे यश प्रेक्षकांच्या प्रतिसादावरच अवलंबून आहे कारण भरतनाट्यम नृत्यशैलीच्या माध्यमातून सादर होणारे हे नृत्यनाट्य आहे.

# MPSC विद्यार्थ्यांचे २ ऑक्टोबरपासून पुण्यात बेमुदत धरणे आंदोलन

**■ पुणे(दै. संध्या)**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसह विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठीचे बहुचर्चित बेमुदत धरणे आंदोलन २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून एस. एम. जोशी पूल, नवी पेठ येथे सुरू होणार आहे. आज पुणे यांच्या समवेत आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थी प्रतिनिधींची एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीमध्ये तांत्रिक कारणांमुळे २७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या आंदोलनाला परवानगी देता येत नसली, तरी २ ऑक्टोबर रोजी (गांधी जयंती) मात्र आंदोलनास परवानगी देण्याबाबत पोलिसांनी सहमती दर्शविली आहे.

अध्यक्षांच्या राजीनाम्यासाठी विद्यार्थी आक्रमक; मुख्यमंत्र्यांसोबत बैठक MPSC विद्यार्थ्यांनी यापूर्वी केलेल्या आंदोलनाद्वारे आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. त्या वेळी "त्यांचा कार्यकाळ आताच सुरू झाला असल्याने राजीनामा देता येणार नाही," अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. परंतु, अलीकडच्या कालावधीमध्ये विवेक भीमनवार यांच्या कारकिर्दीत काही पेपर फुटीची प्रकरणे समोर आल्यामुळे विद्यार्थी पूर्णतः आक्रमक झाले आहेत. अध्यक्षांच्या राजीनाम्याशिवाय आता आंदोलनातून माघार घेतली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत येत्या दोन दिवसांमध्ये MPSC विद्यार्थी आंदोलकांची एक संयुक्त बैठक होणार असून यात विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह इतर तीन प्रमुख मागण्या ठेवण्यात आल्या आहेत. हे आंदोलन पूर्णतः अराजकीय, विद्यार्थ्यांसाठी सर्व पातळ्यांवर संघर्ष करणार: रोहित पवार या आंदोलनाला आमदार रोहित पवार यांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे. रोहित पवार म्हणाले, "सदर आंदोलन हे पूर्णतः अराजकीय स्वरूपाचे असून केवळ विद्यार्थी हिताचे असल्याने यामध्ये आपण सहभागी आहोत. विद्यार्थ्यांना न्याय मिळणे, परीक्षांची पेपरफुटी थांबणे या प्रमुख विषयांसाठी आपण विद्यार्थ्यांसाठी सर्व पातळ्यांवर संघर्ष करण्यास तयार आहोत. मुख्यमंत्र्यांनी यात वेळीच लक्ष घालून विवेक भीमनवार यांचा राजीनामा घेणे हेच योग्य ठरेल.

## थोडक्यात पण महत्वाचे



## नारायणा हेल्थच्या SRCC चिल्ड्रन्स हॉस्पिटलची किडझानिया मुंबईसोबत भागीदारी

**मुंबई : दैनिक संध्या**

नारायणा हेल्थतर्फे व्यवस्थापन करण्यात येत असलेल्या आणि एनएबीएच व जेसीआय मान्यताप्राप्त मुंबईतील आघाडीच्या टर्शरी केअर चिल्ड्रन्स हॉस्पिटलपैकी एक असलेल्या नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलने किडझानिया इंडियासोबत भागीदारी केली आहे. देशातील सर्वात मोठे इनडोअर एज्युटेनमेंट थीम पार्क असलेल्या किडझानियामध्ये हेल्थकेअर प्रोफेशनल्सच्या भूमिका प्रत्यक्ष अनुभवता येतील अशा खास रोल-प्ले ॲक्टिव्हिटीज सुरू करण्यात आल्या आहेत. नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या बालरोग उपचारातील तज्ज्ञतेच्या आधारे तयार करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश लहान मुलांमध्ये जिज्ञासा, सहवेदना आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे. या नव्या अनुभवाच्या माध्यमातून मुलांना सर्जरी, नर्सरी आणि इमर्जन्सी युनिट अशा, हॉस्पिटलमधील विविध विभागांमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील वेगवेगळ्या भूमिका साकारता येणार आहेत. यामध्ये बॅटरीवर चालणाऱ्या ॲम्ब्युलन्सचाही समावेश आहे. मुलांना वैद्यकीय क्षेत्रातील विविध परिस्थिती आणि उपकरणांचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्व समजावे तसेच त्यांच्यामध्ये चिकित्सक विचार, टीमवर्क, सहवेदना आणि रुग्णांची संवेदनशीलतेने काळजी घेण्यासारखी कौशल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने हा अनुभव तयार करण्यात आला आहे. भविष्यात आरोग्यसेवा क्षेत्रातील नेतृत्व घडवण्यासाठी तसेच आरोग्यसेवा प्रत्येकासाठी सहज उपलब्ध असलेले जग निर्माण करण्याची प्रेरणा मुलांना देण्यासाठी नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलने किडझानिया मुंबईमध्ये हा अनोखा अनुभव सुरू केला आहे. सर्वांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे हॉस्पिटलचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. किडझानिया थिएटरमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात या उपक्रमाचे उद्‍घाटन करण्यात आले. यावेळी प्रतीकात्मकरीत्या चावी सुपूर्द करण्यात आली, फीत कापण्यात आली आणि विशेष कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यामुळे हा उद्‍घाटन सोहळा अधिक संस्मरणीय ठरला.

## उजनी प्रदूषण : राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून प्रदूषण नियंत्रण

**सोलापूर : दैनिक संध्या**

उजनी जलाशय आणि भीमा नदी परिसरातील भीषण प्रदूषणामुळे सोलापूरमधील ५ लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या विषारी परिणामांची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. वारंवार स्मरण करून देऊनही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्याच्या आरोग्य विभागाने चौकशी अहवाल सादर न केल्याने, आयोगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आणि आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे प्रधान सचिव यांना २३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता नवी दिल्ली येथे आयोगासमोर आवश्यक चौकशी अहवालासह स्वतः किंवा प्रकरणाची पूर्ण माहिती असलेल्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत हजर राहण्याचे सशर्त समन्स बजावले आहे. सुराज्य अभियानाचे महाराष्ट्र समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी आयोगाकडे केलेल्या तक्रारीनुसार, पुणे आणि सोलापूरमधून दररोज ४,२६२ दशलक्ष लिटर (MLD) प्रक्रिया न केलेले सांडपाणी उजनी खोऱ्यात सोडले जात आहे, ज्यामुळे पाण्यातील मँगनीजची पातळी सुरक्षित मर्यादेपेक्षा तब्बल ५१ पटीने वाढली आहे. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांच्या संविधानात्मक 'जगण्याच्या अधिकाराचे' (Right to Life) थेट उल्लंघन होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणी आयोगाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पहिल्यांदा दखल घेत अहवाल मागवला होता, मात्र त्यानंतर २४ मार्च, १९ मे आणि १४ जुलै २०२६ रोजी तब्बल तीन स्मरणपत्रे पाठवूनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही कृती अहवाल सादर केला नाही. अखेर प्रशासनाच्या या बेजबाबदारपणाची कडक नोंद घेत मानवाधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम १३ अंतर्गत, वरिष्ठ अधिकाऱ्यांना हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जर १६ ऑक्टोबर २०२६ पूर्वी अधिकाऱ्यांनी आवश्यक अहवाल सादर केला, तरच त्यांना वैयक्तिक उपस्थितीतून सूट दिली जाईल, असेही आयोगाने समन्समध्ये स्पष्ट केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना सुराज्य अभियानाचे सोलापूर समन्वयक श्री. दत्तात्रय पिसे म्हणाले, "तीन-तीन स्मरणपत्रे पाठवूनही प्रदूषण मंडळाने आणि आरोग्य विभागाने दखल न घेणे, हे प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे भयंकर उदाहरण आहे. आता मानवाधिकार आयोगाच्या या कडक नोटीशीनंतर तरी १६ ऑक्टोबरपर्यंत संबंधित यंत्रणांनी खरी परिस्थिती आयोगासमोर मांडावी. उजनीच्या पाण्याचे तसेच नागरिकांचे तातडीने 'हेव्ही मेटल्स'साठी (घातक धातूंसाठी) आरोग्य परीक्षण व्हावे, विषबाधित गावांना सुरक्षित पाणीपुरवठा व्हावा आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी."

## ॲरिस्टोक्रॅट सोलाना रिव्ह्यू: कॅबिन बिझनेस लगेज, ज्याची किंमत योग्य ठरते

**पुणे: दैनिक संध्या**

गेल्या पंधरा वर्षांत मी इतक्या वेगवेगळ्या सुटकेसेस वापरून पाहिल्या आहेत की,



बाजारात उपलब्ध असलेल्या जवळपास प्रत्येक झिपर, व्हील आणि हँडलविषयी माझे स्वतःचे मत तयार झाले आहे. त्यामुळे एखादी लगेज बॅग रिव्ह्यू करताना मला क्षणभर थांबून तिच्याकडे पुन्हा पाहावेसे वाटले, तर मी त्याची नक्कीच नोंद घेतो. ॲरिस्टोक्रॅट ची नवीन सोलाना माझ्यासोबत नेमके हेच करून गेली. विशेष म्हणजे, ज्या किमतीपासून ही बॅग उपलब्ध होते, त्या किमतीच्या दृष्टीने हे निश्चितच लक्षवेधी आहे. सर्वप्रथम माझे लक्ष वेधून घेतले ते म्हणजे फ्रंट-ॲक्सेस लॅपटॉप कम्पार्टमेंटने. हे मुख्य कॉम्प्रेशन पॅनेलच्या मागे व्यवस्थित लपवलेले आहे. ऐकायला ही अगदी छोटी गोष्ट वाटू शकते, पण एअरपोर्टवरील सिक्युरिटी चेकच्या वेळी चार्जरची केबल शोधण्यासाठी कपड्यांचा सगळा पसारा काढावा लागतो, तेव्हा त्याचे महत्त्व लक्षात येते. सोलाना मध्ये फक्त एक पॅनेल उघडायचे, लॅपटॉप बाहेर काढायचा आणि पुढे जायचे. या किमतीच्या श्रेणीत अशा प्रकारची विचारपूर्वक केलेली इंजिनीअरिंग अजूनही क्वचितच पाहायला मिळते. यानंतर लक्ष वेधून घेते ती बॅगची व्हील सिस्टिम. चारऐवजी आठ चाके असल्यामुळे सोलाना अतिशय सहजपणे सरकते आणि तिचा अनुभव तिच्या दुप्पट किमतीच्या लगेज बॅगसारखा वाटतो. मी ती गर्दीच्या टर्मिनलमधून चालवत नेली, तरी ती कोणत्याही अडथळ्याशिवाय सरळ मार्गावर चालत राहिली. बजेट हार्ड-शेल लगेजमध्ये नेहमी जाणवणारी हलकी डळमळ येथे जाणवली नाही. त्यात असलेले बिल्ट-इन कॉम्बिनेशन लॉकही उपयोगी आहे आणि त्याच्यामध्ये कोणत्याही अनावश्यक गुंतागुंतीशिवाय दिलेल्या नाहीत. प्रवासाच्या मधोमध पॅडलॉकची किल्ली हरवण्याचा अनुभव ज्यांना आला आहे.

# दखल घ्यावी अशी एक आगळी वेगळी करिअर इन्स्टिट्यूट

■ चव्हाण नगर (दै. संध्या)

नामांकित चव्हाण फाऊंडेशन तर्फे चालविल्या जाणाऱ्या पद्मजा चव्हाण करिअर इन्स्टिट्यूट गेल्या पंचवीस वर्षाची सांस्कृतिक परंपरा जपत गृहिणी, महिलांना स्वावलंबी तसेच उद्योजिका बनवण्याचे स्वप्न साकार करणारी इन्स्टिट्यूट आहे.

एकाच छताखाली 150 प्रकारचे कोर्सेस दिले जातात. त्यामध्ये सर्व प्रकारची इन्स्टंट पीठे, सर्व प्रकारचे मसाले, , केक्स, नानकटाई, बिर्याणी चे प्रकार नॉनव्हेज, सर्व प्रकारच्या ग्रेव्ही व्हाईट, रेड, ग्रीन, ऑरेंज, सॅलेड चे सर्व प्रकार, चायनीज, बंगाली, पंजाबी, गुजराती, कोल्हापुरी पध्दतीच्या रेसिपीज शिकविल्या जातात. याशिवाय, दिवाळीचे सर्व प्रकार पदार्थ, तिळगुळाचे प्रकार तिळगुळाच्या वड्या, विविध प्रकारचे पराठे, विविध प्रकारच्या चटण्या, खाकरे व विविध प्रकार, उन्हाळी पदार्थ कुरडई सांडगे पापड, अळूवडी, सुरळी वडी, कोथिंबीर वडी, गाजर हलवा, मूग हलवा, हलव्याचे विविध प्रकार, हुरडा व हुरड्याचे प्रकार, विविध प्रकारची लोणची 25 प्रकार, आवळा नि आवळ्याचे पदार्थ याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन केले जाते. तसेच, कळण्याची भाकरी, कोंबडी वडे, मालवणी चिकन, कोळंबी व कोळंबी चे पदार्थ, खेकडा रस्सा, खेकडा फ्राय, मासे व माशाचे विविध प्रकार करणे याचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिक दिले जाते.मोदकाचे विविध प्रकार, उकडीचे, तळलेले, वाफवलेले आणि कटाची आमटी, पुरणपोळी, विविध प्रकारच्या भाज्या, इन्स्टंट सूप, सूप चे प्रिमिक्स बनविणे शिकविले जाते.विविध प्रकारच्या कोशिंबिरी दाखविल्या जातात. चवनप्राश, विविध प्रकारच्या सुपाऱ्या, जाम जेली विविध प्रकारचे चॉकलेट, विविध प्रकारचे आईस्क्रीम, विविध प्रकारची सरबते, फळ प्रक्रिया याचे प्रशिक्षण अनुभवी प्रशिक्षक देतात. क्लॉथ पेंटिंग, मधुबनी आर्ट, वारली आर्ट, कॉफी पेंटिंग, निब पेंटिंग, भरत काम, विणकाम, जर दोसी, आरी वर्क, विविध प्रकारची फुले, ऑरगंडीची फुले, कॅनव्हासची फुले, कागदी फुले, ओरिगामी, क्राफ्ट, ब्रेडची फुले ब्रेड क्राफ्ट, व्यावसायिक पध्दतीने पेपर बॅग, आकाश कंदील, सर्व प्रकारच्या कॅण्डल, सर्व प्रकारच्या राख्या, खणाची ज्वेलरी, मोत्याची ज्वेलरी, फुलांच्या माळा, विविध प्रकारची तोरणे, पिशव्या, झबले टोपडे, विविध प्रकारचे गोंडेॲक्रीलिक रांगोळी, आर्टिफिशल रांगोळी, फ्लॉवर बुके, नॅपकिन बुके याचेही प्रशिक्षण मिळते इथे टाकाऊ पासून टिकाऊ या संकल्पनेचा योग्य उपयोग केला जातो. सिरॅमिक पॉट, डांबर फ्लॉवर पॉट, फ्लॉवर पॉट, नेमप्लेट, गिफ्ट पॅकिंग, इकेबाना जपानी



फुल रचना शिकविली जाते. फ्लॉवर अरेंजमेंट, डोहाळे जेवण पुष्परचना, विविध कार्यक्रमासाठी पुष्परचना कशी करावी हे दाखविले जाते. गोधडी, विविध प्रकारची दुपटी, विविध प्रकारची टोपडी कुंची, लोकर व लोकरी पासून स्वेटर झबले टोपडे, साडी तसेच बेडशीट यावर भरत काम करायचे शिकवले जाते. स्टार्ट अप औद्योगिक क्षेत्रात पदार्पण करू इच्छिणाऱ्या महिलांना आयुर्वेदिक शाम्पू आयुर्वेदिक क्रीम आयुर्वेदिक तेल घरच्या घरी ड्रायक्लीन, फिनेल शाम्पू बनविणे, वेगवेगळ्या प्रकारचे साबण करणे याचे अनुभव मिळतात. रुखवत, मॅक्रमच्या वस्तू, सजावटीसाठी विविध प्रकारचे धबधबे, पायपुसणी व त्याचे प्रकार नथ क्लास साठी देखील प्रशिक्षण दिले जाते.

तसेच, टीचर ट्रेनिंग बालवाडी प्रशिक्षण, अंगणवाडी प्रशिक्षण, नॅचरोथेरपी प्रशिक्षण वर्ग, नर्सिंग असिस्टंट कोर्स, जिम ट्रेनर . याव्यतिरिक्त ब्युटी पार्लर बेसिक कोर्स, ब्युटीपार्लर, ॲडव्हान्स, मेकअप कोर्स, हेअर स्टाईल बेसिक, ॲडव्हान्स, ॲडव्हान्स मेंदी यासह फाईल प्रशिक्षण, बेकरी प्रशिक्षण, ॲडव्हान्स कुकरी प्रशिक्षण महिलांना मिळते. संत साहित्याच्या अभ्यासक, साहित्यिक, उद्योजिका, व्याख्यात्या, डॉक्टर गिरीजा शिंदे सामाजिक जाणीवेतून संचालक म्हणून पद्मजा चव्हाण करिअर इन्स्टिट्यूट येथे कार्यरत आहेत.

## ५ वी पास ते उच्चशिक्षित तरुणांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी.!

■ पिंपरी-चिंचवड : (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील बेरोजगार तरुण-तरुणींना हक्काचा रोजगार आणि स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी शहरात भव्य पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी 'रोजगार महाकुंभा'चे आयोजन करण्यात आले आहे. आ. मा.सौ. उमाताई खापरे यांच्या विशेष पुढाकाराने आणि अनुप मोरे, तुषार हिंगे, जयदीप खापरे यांच्या माध्यमातून आणि 'युवा हब स्किल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या सहकार्याने या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा महामेळावा होत आहे.

मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मा. श्री. मंगलप्रभातजी लोढा यांच्या मार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. चिंचवड येथील 'ऑटो क्लस्टर' येथे सकाळी ९:००

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ 'विश्वविक्रमी'

ते दुपारी ३:०० या वेळेत हा महामेळावा पार पडणार आहे. मा.श्री.रविंद्र दादा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

या महाकुंभामध्ये बँकिंग, आयटी, आयटीआय, बीपीओ, केपीओ, रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल आणि टेक्नॉलॉजी यांसारख्या विविध अग्रगण्य क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यामध्ये Axis Bank, ICICI Bank, Tata Motors, Hudas Technology, Wiggle Space, Bajaj आणि Hyundai यांसारख्या दिग्गज कंपन्यांचा समावेश आहे.

या रोजगार मेळाव्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, केवळ उच्चशिक्षितच नव्हे तर ५ वी पास उमेदवारांपासून ते १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच इतर सर्व पात्र उमेदवारांना त्यांच्या कौशल्यानुसार नोकरीच्या हक्काच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

मेळाव्यात सहभागी झालेल्या परंतु तात्काळ नोकरी न मिळालेल्या उमेदवारांसाठी आयोजकांच्या वतीने एक नाविन्यपूर्ण 'जॉब कार्ड' उपक्रम राबविला जाणार आहे. या कार्डद्वारे प्रत्येक उमेदवाराची शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि रोजगाराची गरज याची माहिती संकलित केली जाईल, जेणेकरून भविष्यात उपलब्ध होणाऱ्या योग्य रोजगाराच्या संधींसोबत या तरुणांना जोडता येईल. "प्रत्येक हाताला काम आणि प्रत्येक कुटुंबाला रोजगार व स्वयंरोजगाराची संधी" मिळावी, हा या महाकुंभाचा मुख्य उद्देश आहे.

## आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्सचा महाराष्ट्रात विस्तार; जेजुरी येथे नवीन शाखा सुरू

■ जेजुरी: (दै. संध्या)

आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ("एबीएचएफएल") या आघाडीच्या हाऊसिंग फायनान्स कंपनी आणि आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या उपकंपनीने महाराष्ट्रातील आपला विस्तार वाढवत जेजुरी येथे नवीन शाखा सुरू केली आहे. देशभरातील शाखांचे नेटवर्क वाढवण्याच्या व्यापक योजनेअंतर्गत ही शाखा सुरू करण्यात आली आहे. या नवीन शाखेमुळे महाराष्ट्रातील एबीएचएफएलच्या शाखांची एकूण संख्या 43 झाली आहे. यामुळे वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये कंपनीची उपस्थिती मजबूत होऊन ग्राहकांना अधिक सहजपणे सेवा उपलब्ध होणार आहे.

जेजुरीच्या गृहनिर्माण बाजारपेठेत सातत्याने वाढ होत आहे. पुणे जिल्ह्यातील महत्त्वाचे स्थान, पुणे-सोलापूर औद्योगिक मार्गिका आणि पुणे-सोलापूर महामार्गामुळे सुधारलेली रस्ते कनेक्टिव्हिटी यामुळे या वाढीला चालना मिळत आहे. जेजुरी आणि आसपासच्या भागात घरांची मागणी वाढत आहे. औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी, नोकरी करणारे व्यावसायिक, स्थानिक व्यवसायिक तसेच रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा जवळ असलेले तुलनेने परवडणारे घर शोधणाऱ्या कुटुंबांकडून ही मागणी वाढत आहे. जेजुरीमधील वाढता औद्योगिक विकास तसेच खंडोबा मंदिरामुळे विकसित झालेले धार्मिक पर्यटन यामुळे आर्थिक घडामोडी आणि पायाभूत सुविधांची मागणी वाढत आहे. जेजुरीमधील वाढती औद्योगिक गतिविधी आणि सुधारत असलेली कनेक्टिव्हिटी लक्षात घेता, परवडणाऱ्या आणि सहज उपलब्ध होणाऱ्या घरांची मागणी पुढील काळात वाढण्याची अपेक्षा आहे. जेजुरीमधील एबीएचएफएलची नवीन शाखा ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार गृहकर्जाचे पर्याय आणि स्थानिक पातळीवर मदत उपलब्ध करून देईल.

## नॅचरल डायमंड कौन्सिल आता 'द डायमंड कलेक्टिव्ह' या नव्या रूपात

■ लंडन : (दै. संध्या)

नॅचरल डायमंड कौन्सिल आता 'द डायमंड कलेक्टिव्ह' या नव्या रूपात कार्यरत होणार असून, संस्थेने आज आपल्या नव्या जागतिक धोरणाची घोषणा केली. नैसर्गिक हिऱ्यांना संस्कृतीशी पुन्हा जोडणे, ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करणे आणि दीर्घकालीन महत्त्व कायम राखणे, हा या धोरणाचा उद्देश आहे.

नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी अँबर पेपर यांनी गेल्या सहा महिन्यांत उत्पादक, किरकोळ विक्रेते, ब्रँड्स, सर्जनशील क्षेत्रातील व्यक्ती आणि ग्राहकांशी केलेल्या चर्चेतून हे धोरण आकाराला आले आहे. लक्झरी उत्पादनांचा शोध घेण्याची, त्यांचे मूल्य ठरवण्याची आणि त्यांची खरेदी करण्याची ग्राहकांची पद्धत मूलभूतरीत्या बदलत आहे. या बदलाच्या पार्श्वभूमीवर हे धोरण आखण्यात आले आहे. नैसर्गिक हिऱ्यांविषयीचे आकर्षण पुन्हा निर्माण करणे आणि या आकर्षणाचे रूपांतर सातत्यपूर्ण मागणीत करणे, हे 'द डायमंड कलेक्टिव्ह'चे स्पष्ट उद्दिष्ट आहे.

संस्कृती, किरकोळ विक्री, विश्वास, समर्थन, डिजिटल माध्यमातून होणारा शोध, भागीदारी आणि उद्योगातील विविध घटकांमधील समन्वय यांची सांगड घालत हे धोरण पुढील तीन प्राधान्यांवर आधारित आहे : इन्स्पायर (INSPIRE) – संस्कृती, सर्जनशीलता आणि जागतिक स्तरावर जोडलेल्या कथांच्या माध्यमातून नैसर्गिक हिऱ्यांविषयी आकर्षण निर्माण करणे आणि ग्राहकांना त्यांचा विचार करण्यापासून प्रत्यक्ष खरेदीपर्यंत नेण्यासाठी स्पष्ट मार्ग तयार करणे. प्रोटेक्ट (PROTECT) – स्पष्ट माहिती, पारदर्शकता आणि तथ्यांच्या माध्यमातून ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करणे, चुकीच्या माहितीला आव्हान देणे आणि नैसर्गिक हिरे व कृत्रिम हिरे यांच्यातील फरक स्पष्ट करणे.

## वेगवान हवाई वाहतूक आणि ग्रीन कॉरिडॉरमुळे DPU सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जीव वाचविणारे फुफ्फुस प्रत्यारोपण यशस्वी

■ पुणे : (दै. संध्या)

वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट समन्वय आणि वेळेवर घेतलेल्या निर्णयांचे उल्लेखनीय उदाहरण ठरत, DPU सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे यांनी देवगिरी हॉस्पिटल, परभणी येथून दात्याची फुफ्फुसे पुण्यात यशस्वीरीत्या आणली. या प्रयत्नांमुळे गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णावर जीव वाचविणारे फुफ्फुस प्रत्यारोपण करणे शक्य झाले.

५३ वर्षीय पुरुष रुग्ण गेल्या सहा वर्षांपासून फुफ्फुसांच्या गंभीर आजाराने त्रस्त होते आणि त्यांना ऑक्सिजनच्या अतिरिक्त पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत होते. आजाराची तीव्रता हळूहळू वाढत गेल्याने त्यांच्या दैनंदिन कामकाजावर मोठ्या प्रमाणात मर्यादा आल्या होत्या. योग्य दाता मिळण्याच्या प्रतीक्षेत ते गेल्या दीड वर्षापासून DPU येथे नोंदणीकृत होते. २१ सप्टेंबर रोजी रात्री प्रत्यारोपण पथकाला परभणी येथून संभाव्य फुफ्फुस दात्याबाबत माहिती मिळाली. संबंधित अवयव रुग्णासाठी योग्य असल्याचे आढळून आले. ४६ वर्षीय पुरुष दात्याला २० सप्टेंबर रोजी झालेल्या अपघातात दुखापत झाली होती आणि त्यांना परभणी येथील देवगिरी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. निर्धारित वैद्यकीय तपासण्या, ज्यामध्ये ॲप्निया चाचणीचाही समावेश होता, पूर्ण केल्यानंतर त्यांना मेंदूमृत घोषित करण्यात आले. समुपदेशनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी अवयवदानास संमती दिली आणि इतर गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा निर्णय घेतला. DPU च्या प्रत्यारोपण पथकात ट्रान्सप्लांट सर्जन, पल्मोनोलॉजिस्ट, वैद्यकीय कर्मचारी, परिचारिका, ब्रॉन्कोस्कोपी तंत्रज्ञ आणि ट्रान्सप्लांट समन्वयक यांचा समावेश होता. हे पथक रात्री परभणीच्या दिशेने रवाना झाले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी दाता रुग्णालयात पोहोचले. अवयव काढण्याची प्रक्रिया २२ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे १ वाजता पूर्ण झाली.

परभणी आणि पुणे दरम्यानचे अंदाजे ३८० किलोमीटरचे अंतर आणि फुफ्फुसांच्या प्रत्यारोपणासाठी उपलब्ध असलेला मर्यादित कालावधी लक्षात घेता, केवळ रस्ते वाहतुकीवर अवलंबून न राहता चार्टर्ड विमानाची व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला. रुग्णालय प्रशासनाच्या सहकार्याने हैदराबाद येथून चार्टर्ड विमानाची व्यवस्था करण्यात आली. हे विमान दाता रुग्णालयापासून सुमारे ७५ किलोमीटर अंतरावर असलेल्या नांदेड विमानतळावर पोहोचले.

# अनागोंदी कारभाराविरोधात 'आप' युवा आघाडी आक्रमक

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मुख्यालयाच्या अगदी शेजारी सुरू असलेल्या एका खाजगी बांधकाम प्रकल्पासाठी तब्बल ५२ जुन्या आणि मोठ्या झाडांची बेकायदेशीरपणे व अत्यंत निर्घृण कत्तल करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. बिल्डरच्या फायद्यासाठी वृक्षसंवर्धन विभागातील अधिकारी महेश गारगोटे व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून झाडांचे वय आणि संख्या कागदपत्रांवर कमी दाखवल्याचा आरोप करत आज आम आदमी पार्टी (आप) युवा आघाडीच्या वतीने रविराज काळे यांच्या नेतृत्वात मनपा उद्यान विभागातील अधिकारी महेश गारगोटे यांना 'पैशांचे झाड' भेट देऊन अभिनव आणि तीव्र निषेध नोंदवण्यात आला.

या प्रकरणी आम आदमी पार्टीच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन सादर करून दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खाजगी बिल्डरच्या बांधकामात अडथळा ठरणाऱ्या ५२ जुन्या वृक्षांची कत्तल करण्यासाठी उद्यान विभागातील अधिकाऱ्यांनी झाडांचे वय आणि संख्या यामध्ये फेरफार करून वृक्ष प्राधिकरणाची दिशाभूल केली आहे.

या वृक्षतोडीसंदर्भातील अधिकृत माहिती व कागदपत्रे देण्यास अधिकारी टाळाटाळ करत असून, महापालिकेचा कारभार बिल्डरच्या कार्यालयातून



चालतोय की काय, असा संताप व्यक्त केला जात आहे. ज्या ना-हरकत दाखल्याच्या (NOC) आधारे सदर प्रकल्पाला बांधकाम परवानगी दिली आहे, ती तातडीने रद्द करण्यात यावी आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबवावा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व महाराष्ट्र वृक्षतोड कायद्यानुसार, कर्तव्यात कसूर करणाऱ्या व बेकायदेशीर वृक्षतोडीला खतपाणी घालणाऱ्या उद्यान मुख्य अधिक्षक महेश गारगोटे आणि इतर कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करून त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत फौजदारी खटला दाखल करावा. उद्यान व वृक्षसंवर्धन विभाग हा पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नसून केवळ बिल्डर धार्जिणी भूमिका घेऊन स्वतःचे उदरभरण करण्यासाठीच कार्यरत आहे का, असा सवाल करत रविराज काळे व 'आप' युवा आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उद्यान विभागातील अधिकाऱ्यांना 'पैशांचे झाड' भेट देऊन प्रशासनाच्या भ्रष्ट कारभाराचा पर्दाफाश केला. "झाडांचे रक्षण करायचे सोडून मनपाचे अधिकारी बिल्डरांच्या फायद्यासाठी जुन्या वृक्षांचा बळी देत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




### 'मेड इन पाकिस्तान' क्रीमची पिंपरीत विक्री; २३ क्रीम जप्त

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: भारतात विक्रीस प्रतिबंधित असलेल्या 'मेड इन पाकिस्तान' नमूद केलेल्या 'गोरी ब्यूटी क्रीम'ची पिंपरीतील दुकानातून विक्री होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेने बुधवारी (दि. २३) रिव्हररोड परिसरात कारवाई करून १२ हजार ६५० रुपये किमतीच्या २३ क्रीम जप्त केल्या. प्रकाश मनोहरलाल गुरू (३९, रा. गेलार्ड चौक, पिंपरी) याच्याविरोधात पिंपरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'गोरी ब्यूटी क्रीम'च्या भारतातील कंपनीचे अधिकृत तपासणी अधिकारी रईसोदीन इनामदार यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रिव्हर रोडवरील पीएमपीएमएल बस थांब्याजवळ असलेल्या शक्ती कॉस्मेटिक्स दुकानात 'मेड इन पाकिस्तान' नमूद असलेल्या आणि भारतात विक्रीस परवानगी नसलेल्या बनावट गोरी ब्यूटी क्रीमची विक्री होत असल्याची माहिती दहशतवाद विरोधी शाखेला मिळाली होती. त्यानुसार, एटीबीच्या पथकाने पिंपरी पोलिसांच्या मदतीने दुकानात कारवाई केली. तपासणीदरम्यान दुकानात प्रत्येकी ५५० रुपये किमतीच्या २३ क्रीम आढळून आल्या. त्यांची एकूण किंमत १२ हजार ६५० रुपये आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) तसेच कॉपीराइट कायद्याच्या कलम ५१ आणि ६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आवाड, अपर आयुक्त डॉ. बसवराज तेली आणि उपायुक्त धीरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी शाखेने पिंपरी पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अभिजित केणे करीत आहेत. केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या २ मे २०२५च्या अधिसूचनेनुसार पाकिस्तानातून भारतात सर्व प्रकारच्या वस्तूंच्या आयातीवर बंदी आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत 'मेड इन पाकिस्तान' नमूद असलेल्या वस्तूंची विक्री होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी दहशतवाद विरोधी शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### DICE उपक्रमासाठी थेरगावच्या पीएम श्री माध्यमिक विद्यालयाची निवड

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी : भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या Developing Innovation Culture and Entrepreneurship (DICE) in Schools या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचालित पीएम श्री माध्यमिक विद्यालय, थेरगाव यांची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून निवड झालेल्या केवळ १० शाळांमध्ये या विद्यालयाचा समावेश असल्याने महानगरपालिका शिक्षण विभागासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे. DICE उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, सर्जनशील विचार, समस्या सोडविण्याची क्षमता, डिझाईन थिंकिंग, उद्योजकता आणि प्रोटोटाइप निर्मिती यांसारखी कौशल्ये विकसित करणे हा आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातील समस्या ओळखून त्यावर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची तसेच त्या कल्पनांचे प्रत्यक्ष नमुने (Prototype) विकसित करण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमासाठी JSPM कॉलेज, वाकड हे उच्च शिक्षण संस्थेचे (HEI) तांत्रिक व मार्गदर्शक सहकार्य विद्यालयाला मिळणार आहे. प्रा. श्रीमती दीपाली मगदूम या उपक्रमाच्या समन्वयक म्हणून काम पाहणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या कल्पनांना आकार देणे, प्रोटोटाइप विकसित करणे आणि नवोपक्रमाच्या पुढील टप्प्यांसाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. DICE अंतर्गत विद्यालयात उद्योजकीय कौशल्य विकास, क्षेत्रभेटी, कल्पना निर्मिती कार्यशाळा, Proof of Concept आणि Prototype विकास, Startup Ecosystem व Intellectual Property Rights (IPR) संदर्भातील मार्गदर्शन तसेच Demo Day आणि प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, विद्यार्थी आणि JSPM कॉलेज वाकड यांच्या सहकार्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या निवडीमुळे थेरगाव परिसरातील विद्यार्थ्यांना "समस्या ओळखा, कल्पना सुचवा, नवोपक्रम करा आणि प्रोटोटाइप तयार करा" या संकल्पनेनुसार काम करण्यासाठी एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

### ड्रेनेज चेंबरच्या दुरुस्तीभोवती तुटलेल्या झाकणांचाच 'धोका'

**पिंपरी : दैनिक संध्या**

जोरदार पावसामुळे दुरवस्था झालेल्या ड्रेनेज चेंबरवर झाकणे बसविण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे; मात्र धोका टाळण्यासाठी बसविलेल्या झाकणाभोवतीच जुन्या तुटलेल्या झाकणांचाच अडथळा उभा करण्यात आल्याचे चित्र शहरात काही ठिकाणी दिसून येत आहे. सिमेंटचे काम खराब होऊ नये म्हणून तुटलेली झाकणेच आजूबाजूला ठेवण्यात आली आहेत. या तुटलेल्या झाकणांमुळे दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका वाढला आहे. पावसाळ्यात शहरातील अनेक रस्त्यांवरील ड्रेनेज चेंबरची झाकणे खराब झाली अथवा पाण्याच्या प्रवाहामुळे बांधकाम खचले. काही ठिकाणी झाकणे फुटली, तर काही ठिकाणी ती चेंबरमधून बाहेर पडून रस्त्यावर पडली. परिणामी, वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी ही ठिकाणे धोकादायक बनत आहेत. महापालिकेने आता अशा ठिकाणी नवीन झाकणे बसविण्यास सुरुवात तर केली आहे; मात्र दुरुस्तीच्या पद्धतीमुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. नवीन झाकणे बसविल्याचे बांधकाम खराब होऊ नये म्हणून त्याभोवतीच जुनी झाकणे टाकण्यात आली आहेत. बांधकाम पक्के होईपर्यंत वाहने त्या भागावरून जाऊ नयेत, यासाठी साधारणपणे बॅरिकेडिंग करणे अपेक्षित असते. मात्र, काही ठिकाणी तुटलेली जुनी ड्रेनेज झाकणेच नवीन बांधकामाभोवती ठेवण्यात आल्याचे दिसत आहे. परिणामी, सुरक्षेसाठी केलेली ही तात्पुरती व्यवस्था स्वतःच अडथळा बनत आहेत. दिवसा रस्त्यावर पडलेले झाकण सहज दिसू शकते. मात्र, रात्रीच्या वेळी दिसून न आल्याने दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा धोक संभवू शकतो. दु रुस्तीच्या ठिकाणी नागरिकांना प्रवेश होऊ नये, यासाठी योग्य बॅरिकेडिंग करणे हा सुरक्षित पर्याय आहे. मात्र, तुटलेली ड्रेनेज झाकणेच बॅरिकेडसारखी वापरली जात असतील तर त्यांच्या तीक्ष्ण, असमान किंवा तुटलेल्या भागांमुळे उलट धोका निर्माण होऊ शकतो. सुरक्षा व्यवस्था ही केवळ अडथळा निर्माण करण्यापुरती नसून ती नागरिकांना स्पष्टपणे दिसणारी आणि अपघात रोखणारी असणे आवश्यक आहे. ड्रेनेज चेंबरची दुरुस्ती करताना नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येत आहे. दुरुस्तीच्या ठिकाणी तुटलेली झाकणे किंवा बांधकाम साहित्यामुळे नागरिकांना अडथळा अथवा धोका निर्माण होत असल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना ते तातडीने हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आवश्यक ठिकाणी बॅरीकेडिंग व रिफ्लेक्टरची व्यवस्था करण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे अजय सुर्यवंशी, सह शहर अभियंता, स्थापत्य विभाग, शहरी दळण वळण यांनी सांगितले.

# पवना नदीत रासायनिक सांडपाणी

## शिरगाव परिसरातील नाल्यात प्रक्रिया न केलेले सांडपाणी व लिचेट सोडल्याचे उघड

**पिंपरी : (दै. संध्या)**

मावळ तालुक्यातील शिरगाव परिसरातील काही औद्योगिक कंपन्यांचे रासायनिक सांडपाणी आणि लिचेट (कचऱ्यातून निर्माण होणारा विषारी द्रव) प्रक्रिया न करता थेट नााल्यात सोडले जात होते. नाल्याद्वारे ते सांडपाणी पवना नदीत मिसळत होते. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) दोषी कंपन्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे. या प्रकरणात चार कंपन्यांना एकूण दोन कोटी 58 लाख 17 हजार 500 रुपयांची पर्यावरणीय नुकसान भरपाईनुसार दंड निश्चित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय हरित लवादात (एनजीटी) प्रदूषण मंडळाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातून ही बाब समोर आली. गंगा पेपर्स इंडिया लिमिटेड, रायझिंग प्रॉपकॉन एलएलपी, मेन्ट्रो अॅग्रो प्रॉडक्ट्स आणि कराग्या फूड्स या कंपन्यांवर नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे. नियम उल्लंघनाचा कालावधी आणि उद्योगांची श्रेणी विचारात घेऊन दंडाची ही रक्कम निश्चित केली आहे. मेन्ट्रो अॅग्रो प्रॉडक्ट्सच्या पाहणीत रासायनिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ईटीपी व एसटीपी) बंद असल्याचे आढळले आहे.

भुसा व बॉयलर धुरातून निर्माण होणारे प्रक्रिया न केलेले सांडपाणी आवाराबाहेर सोडले जात होते. त्यातून निर्माण होणारे लिचेट जवळच्या नाल्यातून पवना नदीला मिळत असल्याचे अहवालात नमूद आहे. गंगा पेपर्स येथील ईटीपीमधील लिचेट नाल्यात सोडले जात होते. तसेच कागदी कचरा व मैलायुक्त गाळ (स्लज) उघड्यावर साठविल्याचे आढळले. कामगार आणि पॉवर प्लांटमधील सांडपाणीही नाल्यामार्फत पवना नदीपर्यंत पोहोचत असल्याचे नोंदवण्यात आले आहे. रायझिंग प्रॉपकॉनच्या मागील नाल्यातही हा विसर्ग आढळला. नाल्यालगत कचरा आणि बांधकामाचा राडारोडा टाकल्याचे प्रदूषण मंडळाने आपल्या अहवालात नमूद केले आहे.



### Goree Beauty Cream प्रकरणात अटकेपूर्वी BNSS 35(3) ची नोटीस नाही

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरीतील 'Goree Beauty Cream' विक्रीप्रकरणातील आरोपीच्या अटकेसंदर्भात न्यायालयाने महत्त्वाची नोंद करत आरोपीला तात्काळ मुक्त करण्याचा आदेश दिला. अटकेपूर्वी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम 35(3) अन्वये आवश्यक नोटीस बजावण्यात आली नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी केलेली पोलीस कोठडीची मागणी न्यायालयाने फेटाळून आरोपी प्रकाश मनोहरलाल गुरु यांना 'Release Forthwith' असा आदेश दिला.

पिंपरी पोलीस ठाण्यात FIR क्रमांक 831/2026 दाखल असून, त्यामध्ये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 318(4) तसेच Copyright Act, 1957 मधील कलम 51 व 63 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात पोलीस कोठडीची मागणी केली होती. आरोपीच्या वतीने अॅड. नरेश शामनानी यांनी बाजू मांडताना अटकेपूर्वीच्या कायदेशीर प्रक्रियेचे पालन झाले आहे का, यावर भर दिला. अटकेपूर्वी BNSS कलम 35(3) अंतर्गत नोटीस देण्यात आली नसल्याचा मुद्दा त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. तसेच संबंधित उत्पादनाचे स्वरूप, लागू असलेल्या कायदेशीर तरतुदी आणि अटकेची आवश्यकता याबाबतही त्यांनी युक्तिवाद केला. या संदर्भात अॅड. शामनानी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या Satender Kumar Antil Vs. CBI तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या Chandrashekhar Bhimsen Naik Vs. State of Maharashtra या निर्णयांचा आधार घेतला.

### १०० सीसीटीव्हींच्या मदतीने चैन स्नॅचिंग व दुचाकी चोरीचा गुन्हा उघड; तीन आरोपी जेरबंद

**पिंपरी (दै. संध्या)**




पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने उल्लेखनीय कामगिरी करत सतत दहा दिवस पाठपुरावा करून आणि सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून चैन स्नॅचिंग व दुचाकी चोरीच्या दोन गुन्ह्यांचा छडा लावला आहे. या कारवाईत एमपीडीए अंतर्गत नोंद असलेल्या आरोपीसह दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून सोन्याचे मंगळसूत्र आणि चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या सूचनेनुसार एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चैन स्नॅचिंग प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट-३ कडून सुरू होता. तपासादरम्यान पोलिसांनी विविध ठिकाणांवरील सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून संशयितांचा माग काढला. दि.२३ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की, चैन स्नॅचिंग प्रकरणातील तीन संशयित मोशीतील आदर्शनगर परिसरात फिरत आहेत. त्यानुसार पोलिसांनी संघर्ष कॉलनी, आदर्शनगर येथे सापळा रचून इंदर अनिल राजपूत (वय २२), महेश कान्हा राजपूत (वय २६) आणि एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी मोशीतील सेक्टर-४, प्राधिकरण परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावल्याची तसेच पुरंदर तालुक्यातील कोळविहरे येथून होंडा युनिकॉर्न दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली.

### अण्णासाहेबांचा संघर्ष आजही प्रेरणादायी : कामगारनेते इरफानभाई सय्यद

**पिंपरी (दै. संध्या)**

माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करून कामगार चळवळीला नवी दिशा देणारे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक तथा माथाडी कामगारांचे भाग्यविधाते स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त शिवसेना प्रणित महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. चिंचवड येथील के. एस. बी. चौकातील स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला.

यावेळी शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद म्हणाले, "स्व. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांना केवळ हक्क मिळवून दिले नाहीत, तर त्यांच्या श्रमाला सामाजिक प्रतिष्ठा आणि कायदेशीर संरक्षण मिळवून देण्यासाठी मोठा संघर्ष केला. कामगारांच्या प्रश्नांसाठी त्यांनी उभारलेली चळवळ आजही लाखो कामगारांना प्रेरणा देत आहे. त्यांच्या विचारांची आणि कार्याची जपणूक करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल."

माथाडी कामगारांच्या समस्या, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि कामगार कल्याणासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. अण्णासाहेब पाटील यांनी उभारलेली कामगार चळवळ ही केवळ एका समाजाची किंवा घटकाची नसून कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

यावेळी पिंपरी-चिंचवड शहर पुणे जिल्हाध्यक्ष हनुमंत तरडे, पुणे जिल्हा संघटक प्रदीप धामणकर, मारुती अप्पा कवदरे, नागेश वनवटे, रवि गोडेकर, सर्जेराव कचरे, अशोक साबळे, सुरेश ठीक, अविनाश भोसले, संदीप जांभळे, रोहित नवले, युवराज पोतेकर, अजय भोर, किरण देवकर, गणेश देवडकर, सुरज गुजर, अमित पासलकर, सुनील सावळे, अमृत शिंदे, अविनाश जांभळे, नाना नाईकवाडे, संदीप साबळे, गणेश नाईकवाडे, आयुष शिंदे, रत्नाकर भोजने, विक्रम मोरे, सोमनाथ डफळे, समर्थ नायकवडे, सुभाष पुजारी, महेश पार्टे, सागर पवार, बालाजी खैरे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, विविध माथाडी टोळ्यांचे मुकादम आणि मोठ्या संख्येने सभासद कामगार उपस्थित होते.

### "इंडस्ट्रियल एस्पायरा" या तांत्रिक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**पिंपरी (दै. संध्या)**

युवती व महिलांना अभियांत्रिकी व उत्पादन क्षेत्रातील रोजगाराच्या संधीसाठी आवश्यक ते तांत्रिक कौशल्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इंजिनिअरिंग क्लस्टर, पुणे या संस्थेच्या वतीने महिलांसाठी मोफत सहा महिन्यांचे ऑफलाइन तांत्रिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत अशी माहिती इंजीनियरिंग क्लस्टर पुणे या संस्थेचे संचालक सागर शिंदे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टीम, पुणे यांच्या सीएसआर सहकार्याने २८ सप्टेंबर पासून सुरू होत असलेल्या पूर्णतः मोफत असलेल्या "इंडस्ट्रियल एस्पायरा – अॅडव्हान्स सर्टिफिकेशन इन सीएनसी ऑपरेशन डिझाईन अँड कॉलिटी कंट्रोल" या ऑफलाइन तांत्रिक प्रशिक्षण वर्गाची ही तिसरी बॅच आहे. या उपक्रमांतर्गत उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामध्ये सीएनसी प्रोग्रामिंग व ऑपरेशन, डिझाईन, क्वालिटी कंट्रोल, मॅन्युफॅक्चरिंग, सॉफ्ट स्किल, प्रत्यक्ष औद्योगिक भेटी, प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि ऑन द जॉब ट्रेनिंग यांचा समावेश आहे. हे ६ महिन्यांचे प्रशिक्षण २८ सप्टेंबर २०२६ पासून इंजीनियरिंग क्लस्टर पुणे, भोसरी एमआयडीसी, ५३६ जे ब्लॉक, गवळीमाथा जवळ येथे सुरू होणार आहे. या प्रशिक्षणासाठी किमान बारावी उत्तीर्ण आणि १८ ते २५ वर्षे वयोगटातील युवती, महिला अर्ज करू शकतात. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर पुणे व परिसरातील इंजिनिअरिंग व मॅन्युफॅक्चरिंग उद्योगांमध्ये रोजगारासाठी प्लेसमेंट सपोर्ट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील निवडक ५ प्रशिक्षणार्थींसाठी निवास व भोजनाची सुविधा पूर्णतः मोफत उपलब्ध आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये २९ सप्टेंबरला भव्य 'रोजगार महाकुंभ'

**पिंपरी (दै. संध्या)**

शहरातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे भव्य पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी 'रोजगार महाकुंभ' आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत होणाऱ्या या महाकुंभात विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

हा उपक्रम आमदार उमा खापरे यांच्या विशेष पुढाकाराने तसेच भाजप युवा मोर्चाचे माजी प्रदेशाधक्ष अनुप मोरे, माजी उपमहापौर तथा नगरसेवक तुषार हिंगे आणि जयदीप खापरे यांच्या माध्यमातून व 'युवा हब स्किल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे. विविध सामाजिक संस्थांचेही या उपक्रमाला सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाला भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

नामांकित कंपन्यांचा सहभाग..

महाकुंभामध्ये बँकिंग, आयटी, बीपीओ, केपीओ, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, रिअल इस्टेट आणि टेक्नॉलॉजी क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्या सहभागी होणार आहेत. Axis Bank, ICICI Bank, Tata Motors, Hudas Technology, Wiggle Space, Bajaj आणि Hyundai यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांचे प्रतिनिधी उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. या रोजगार मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे ५ वी पास, १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच इतर पात्र उमेदवारांसाठी त्यांच्या शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यानुसार नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

नोकरी न मिळालेल्या उमेदवारांसाठी विशेष 'जॉब कार्ड' योजना राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि रोजगाराची गरज यांची माहिती संकलित करून भविष्यातील रोजगाराच्या संधींशी त्यांना जोडले जाणार आहे.

"प्रत्येक हाताला काम आणि प्रत्येक कुटुंबाला रोजगार व स्वयंरोजगाराची संधी" हा या महाकुंभाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींनी आपली आवश्यक कागदपत्रे आणि अद्ययावत बायोडाटा (Resume) सोबत घेऊन २९ सप्टेंबर रोजी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन अनुप मोरे, तुषार हिंगे आणि जयदीप खापरे यांनी केले आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### धामणीत खंडोबाला पत्रीपूजा व फुलांची आरास

**लोणी- धामणी : दैनिक संध्या**

धामणी(तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाचा व खंडोबा.म्हाळसाई.व बाणाईच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांना रूद्राभिषेक व दुग्धाभिषेक करुन पत्री फूल पूजा सोहळा उत्साहात शनिवारी( २६सप्टेबर २६) साजरा झाला.भाद्रपद पौर्णिमेनिमित्तच्या पारंपारिक पत्री पूजेला मंदिराचे मुख्य गाभाऱ्यात सुगंधी फुलांची व फळांची आरास करण्यात आली होती. यामुळे मंदिर परिसर भक्तिने आणि सुगंधाने न्हाऊन निघाला होता. भाद्रपद महिण्यातील पौर्णिमेच्या मुहर्तावर शनिवारी (२६ सप्टेबर२६) शेकडो भाविकांनी "सदानंदाचा येळकोट,जय मल्हारच्या नामघोषात धामणी (तालुका आंबेगांव) येथील पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन घेतले. धामणीच्या पुरातन खंडोबा मंदिरात पहाटे चार वाजता घंटानाद झाला.त्यानंतर आठ यजमान जोडप्यांच्या हस्ते दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक संपन्न झाला. यावेळी खंडेराय. म्हाळसाई. बाणाई व जोगेश्वरीच्या देखण्या मूर्तींना वस्रालंकार व सुंगधी फुलांचे हार घालण्यात आल्यानंतर देवस्थानाचे सेवेकरी मंडळी दादाभाऊ भगत. प्रभाकर भगत. सुभाष तांबे. शांताराम भगत राजेश भगत अनिरुद्ध वाळुंज यांच्याकडून स्वयंभू सप्तशिवलिंग आणि पंचधातूच्या सर्वांगसुंदर देखण्या खंडोबा.म्हाळसाई व बाणाईच्या मुखवट्यावर सुवासिक केशर व सुंगधी दवण्याचे अत्तरमिश्रित केलेल्या पत्रीच्या पानाचे लेपन करण्यात आले.त्यानंतर खंडेरायाला नैवेद्य दाखवण्यात येऊन शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. पौर्णिमेच्या अभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले.



### शाळा व्यवस्थापन समितीचा 'ॲक्शन मोड'

**कवठे येमाई: दैनिक संध्या**

विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता लक्षात घेऊन शाळेच्या ५० मीटर परिसरातील जंक फूडची विक्री तात्काळ बंद करण्यात यावी, तसेच शाळेच्या संरक्षण भिंतीलगत असलेले अतिक्रमण त्वरित हटवावे, असा ठराव आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झालेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत करण्यात आला.यामुळे आता शाळा व्यवस्थापन समितीचा 'ॲक्शन मोड सुरु झाला असून संरक्षण शाळे भिंती सभोवतालच्या ५० मीटर परिसरातील दुकानांतून सुरु असलेली जंक फूड विक्री तात्काळ बंद करा, सभोवतालचे अतिक्रमण स्वतःहून हटवा अन्यथा कारवाई अटळ असल्याचा इशारा ही आजच्या बैठकीत देण्यात आला आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरतशेठ भोर हे होते. प्रारंभी मुख्याध्यापक शांताराम पोकळे यांनी आजच्या बैठकीत शालेय कामकाज, ५० मीटर परिसरात असलेली जंक फूडला बंदी, शाळा भिंती लगतचे अतिक्रमण शाळेच्या परिसरात अस्वच्छता निर्माण करणारे तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणारे खाद्यपदार्थ विक्रीचे प्रकार थांबविण्याची गरज पोकळे यांनी बैठकीत बोलताना व्यक्त केली. तसेच संरक्षण भिंतीलगत करण्यात आलेले अतिक्रमण विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. त्यामुळे संबंधितांनी अतिक्रमण तात्काळ हटवावे, अन्यथा नियमानुसार कारवाई करण्यात यावी, असा निर्णय समितीने आजच्या बैठकीत घेतला.यावेळी मुख्याध्यापक शांताराम पोकळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा डॉ. आरती उचाळे,अर्चना देवकर,तज्ञ शिक्षण संचालक वरिष्ठ पत्रकार सुभाष अण्णा शेटे,प्रशांत सांगडे,भाऊसाहेब घोडे,गणेश गावडे,विलास सालकर यांच्यासह समितीचे सदस्य व अनेक मान्यवर उपस्थित होते.




### तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती संघास कबड्डी स्पर्धेत दुहेरी मुकुट

**बारामती : दैनिक संध्या**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे आयोजित बारामती तालुकास्तर कबड्डी स्पर्धा दिनांक २१ ते २३ सप्टेंबर २०२६ दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, बारामती या ठिकाणी संपन्न झाल्या. या स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती च्या १७ वर्ष वयोगट मुले व १९ वर्ष वयोगट मुले या दोन्ही संघानी विजेतेपद प्राप्त करीत दुहेरी मुकुट मिळवला. १७ वर्ष वयोगट संघातील समीर नेवसे, युवराज जाधव, आयुष देवकाते, अविनाश खंडागळे, नरेंद्र अवचट, हर्षित पटेल, समर्थ गोसावी, गौरव पारेकर, रोहन बनकर, सार्थक गवंड, यश कोकरे या सर्वांनी सांघिक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून सांघिक विजेतेपद प्राप्त केले. १९ वर्ष वयोगट संघातील यश भोपळे, पार्थ जाधव, ओम साळुंके, यश वाघमोडे, पिसाळ प्रदीप, केशव जगताप, कुणाल भापकर, समर्थ जाधव, साहिल सुपेकर, रुद्राक्ष रहाटे, ओम शिंदे, अनुज नलवडे यांनी देखील आक्रमक चढाई व बचावात्मक खेळ करीत उत्कृष्ट सांघिक खेळ करून विजेतेपद प्राप्त केले. या दोन्ही संघातील खेळाडूंची पुणे जिल्हास्तर शालेय स्पर्धेतसाठी निवड झालेली आहे. प्राचार्य प्रा.डॉ.अविनाश जगताप यांनी या दोन्ही संघातील खेळाडूंचे कौतुक व अभिनंदन केले व पुढील जिल्हास्तर स्पर्धेसाठी अधिक मेहनत घेऊन विजयी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना प्रा.डॉ.गौतम जाधव व प्रा.अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले. दोन्ही संघांच्या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, उपप्राचार्य, प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.



# मॉडिफाईड बुलेटच्या कर्णकर्कश आवाजाला लगाम

■ **उरुळी कांचन (दै. संध्या)**

उरुळी कांचन (ता. हवेली) पोलीस ठाण्याच्या हद्दीत मॉडिफाईड बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाक्यांसारखे कर्णकर्कश आवाज काढत धिंगाणा घालणाऱ्या वाहनचालकांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारींची दखल घेत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत १३ मॉडिफाईड बुलेटवर कारवाई करून १ लाख ६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, तर यापूर्वी जप्त करण्यात आलेले २९ मॉडिफाईड सायलेन्सर रस्त्यावर ठेवून रोलर फिरवून नष्ट करण्यात आले.

पुणे-सोलापूर महामार्गासह उरुळी कांचन, कोरेगाव मूळ, शिंदवणे, सोरतापवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून मॉडिफाईड सायलेन्सर बसविलेल्या बुलेटमधून मोठमोठे आवाज काढण्याचे प्रकार वाढले होते. काही वाहनचालक सायलेन्सरमधून फटाक्यांसारखे आवाज काढत सुसाट वेगाने वाहने चालवत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. याशिवाय, कर्कश हॉर्नचा वापर करणे, नंबर प्लेट नसताना वाहने चालविणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करण्याचे प्रकारही निदर्शनास येत होते. या प्रकारामुळे परिसरातील वृद्ध नागरिक, आजारी व्यक्ती, लहान मुले तसेच सामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. नागरिकांनी याबाबत उरुळी कांचन पोलिसांकडे सातत्याने तक्रारी केल्या होत्या.

नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी वाहतूक विभागाला विशेष कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने मॉडिफाईड सायलेन्सर वापरणाऱ्या वाहनांवर लक्ष केंद्रित करून कारवाई केली.

या मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १३ बुलेट मोटारसायकलींवर प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO), पुणे यांच्यामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली. संबंधित वाहनचालकांकडून एकूण १ लाख ६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

कारवाईदरम्यान यापूर्वी जप्त करण्यात आलेले २९ मॉडिफाईड सायलेन्सर पोलिसांनी रस्त्यावर ठेवून त्यावर रोडरोलर फिरवला. या कारवाईत हे सायलेन्सर पूर्णपणे चेपून नष्ट करण्यात आले. मॉडिफाईड सायलेन्सरविरोधात पोलिसांनी घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली आहे. केवळ मॉडिफाईड सायलेन्सर वापरणाऱ्या वाहनचालकांवरच कारवाई न करता, वाहनांमध्ये बेकायदेशीर फेरफार करणाऱ्या गॅरेजचालकांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. वाहनांच्या मूळ रचनेत नियमबाह्य बदल करून कर्णकर्कश आवाज निर्माण करणारे सायलेन्सर बसविणाऱ्यांवरही पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येणार आहे.

ही धडक कारवाई उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक विभागाचे सहायक फौजदार रमेश भोसले, पोलीस अंमलदार शरद चव्हाण, अमोल खांडेकर, अश्वजीत मोहोड, धनंजय भोसले, वार्डन हिरामण करे, तसेच होमगार्ड राजू मेंगजी, नागेश चव्हाण, नवनाथ चव्हाण आणि नवनाथ वेताळ यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. दरम्यान, सार्वजनिक रस्त्यांवर कर्णकर्कश आवाज करणाऱ्या मॉडिफाईड सायलेन्सरचा वापर, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि बेकायदेशीर फेरफार करणाऱ्या वाहनांवर यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## पीडीसीसी बँकेला 'सर्वोत्कृष्ट सहकारी बँक'चा राष्ट्रीय पुरस्कार



■ **नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)**

सहकारी साखर उद्योगाच्या विकासात मोलाचे योगदान दिल्याबद्दल पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला (पीडीसीसी) राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा 'सर्वोत्कृष्ट सहकारी बँक' पुरस्कार जाहीर झाला आहे. राष्ट्रीय सहकारी साखर संघ, नवी दिल्ली यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवी दिल्ली येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

बँकेच्या वतीने अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी हा सन्मान स्वीकारला. या प्रसंगी बँकेचे संचालक भालचंद्र जगताप, प्रवीण शिंदे, संचालिका निर्मलाताई जागडे, पुजाताई बुट्टे-पाटील, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे, बिगरशेती विभागाचे उपसरव्यवस्थापक अभिजीत हेगडे उपस्थित होते.

पुरस्कार स्विकारल्यानंतर प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे म्हणाले, "हा पुरस्कार पहिल्यांदाच दिला जात असून पहिल्याच वर्षी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवड होणे, ही पुणे जिल्ह्यातील लाखो शेतकरी सभासदांसाठी अभिमानाची बाब आहे. पीडीसीसी बँक आज देशातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये व्यवसायिक उलाढालीत प्रथम क्रमांकावर आहे."

बँकेची आर्थिक कामगिरी देताना ते म्हणाले, मार्च २०२६ अखेर बँकेची एकूण उलाढाल ३० हजार ७६४ कोटी ७४ लाख रुपयांवर पोहचली आहे. बँकेच्या एकूण ठेवी १७ हजार १८९ कोटी १३ लाख रुपये आहेत. मार्च २०२६ अखेर बँकेला ४६१ कोटी ३४ लाख रुपयांचा ढोबळ नफा तर ७८ कोटी ७८ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. सहकार क्षेत्रातील ९ आणि खाजगी क्षेत्रातील २० अशा एकूण २९ साखर कारखान्यांना बँकेने आतापर्यंत ८ हजार ८७७ कोटी ९४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी बँक नेहमीच अग्रेसर राहिली आहे. हवामान बदल आणि शेतीच्या वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर बँकेने अजितदादा पवार कृषी समृद्धी योजना सुरू केली आहे. ही योजना पूर्णपणे एआय तंत्रज्ञानावर आधारित आहे. या योजनेमुळे पुणे जिल्ह्यातील शेतकरी आधुनिक शेतीकडे वळतील. या तंत्रज्ञानामुळे ऊस उत्पादनात ४० टक्के वाढ होणार असून पाण्यामध्ये ३० टक्के तर रासायनिक खतांमध्ये २० ते ३० टक्के बचत होणार आहे. यामुळे जमिनीचा कस सुधारण्यास मोठी मदत होणार आहे.

## 'होम मिनिस्टर' स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ **पिंपरी (दै. संध्या)**

जय भवानी मित्र मंडळ दरवर्षी लहान मुले आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रम राबवित असते. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून चार आनंदाचे क्षण सर्वांना अनुभवता यावेत, यासाठी मंडळ सर्वांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत असते.त्यामुळे परिसरातील सर्व महिला व मुले गणेशोत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात. त्याचाच एक भाग म्हणून यंदा मंडळाने महिलांसाठी खास 'होम मिनिस्टर' या लोकप्रिय स्पर्धेचे आयोजन केले होते. पावसाचे वातावरण असतानाही या स्पर्धेला शेकडो महिलांनी उल्लेखनीय उपस्थिती नोंदवत उत्साहात सहभाग घेतला. स्पर्धेचे सूत्रसंचालन संदेश पारकर आणि रोहन कांबळे यांनी आपल्या अनोख्या आणि खुमासदार शैलीने केले. स्पर्धेची सुरुवात हास्यविनोद आणि मनोरंजक प्रश्नांनी झाली. योग्य उत्तर देणाऱ्या महिलांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. महिलांनी सादर केलेल्या बहारदार उखाण्यांनी स्पर्धेत चांगलीच रंगत आणली. विविध खेळांमध्ये स्पर्धक महिलांनी उत्साहात सहभाग घेतला. जसजशी स्पर्धा पुढे जात होती, तसतशी स्पर्धकांमध्ये चुरस आणि प्रेक्षकांमध्ये उत्कंठा वाढत होती. स्पर्धेचा निकाल: • प्रथम क्रमांक: सौ. सुष्मा जराड • द्वितीय क्रमांक: सौ. लता महंकाळे • तृतीय क्रमांक: सौ. सारिका तावरे विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण नगरसेविका मा. अर्चनाताई तापकीर आणि राष्ट्रवादी महिला उपाध्यक्ष मा. अश्विनीताई तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष संजय जराड यांच्यासह चंद्रकांत तापकीर, शशिकांत तापकीर, मनोज शिंदे, संतोष जराड, गणेश वाबळे, स्वप्निल नवथरे, राहुल तावरे, महेश तावरे, या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.



## प्रातिभा जॉब फेअर २०२६, रोजगाराच्या विविध संधी : डॉ . शहा

■ **पिंपरी(दै. संध्या)**

चिंचवड येथील प्रातिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने प्रतिभा महाविद्यालय येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'प्रातिभा जॉब फेअर २०२६' या रोजगार मेळाव्याचे आयोजन मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे एम्प्लॉयमेंट ऑफिस तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व पुणे येथील उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या सहकार्याने हा मेळावा होणार आहे.



प्रातिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचा हा ११ वा मेगा जॉब फेअर असून, विविध क्षेत्रातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच राष्ट्रीय स्तरावरील कंपन्या सहभागी होणार आहेत. यामध्ये ५० हून अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग अपेक्षित असून, सुमारे १,००० नोकरीच्या संधी जागेवर उपलब्ध होणार असल्याची माहिती प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे संस्थापक सचिव डॉ . दीपक शहा यांनी दिली आहे.

या रोजगार मेळाव्यात फ्रेशर्स तसेच अनुभवी उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. बी.कॉम., बीबीए, बीसीए, बी.एस्सी., एम.कॉम., एमबीए, एमसीए, एम.एस्सी., बीई, बी.टेक., एमई, एम.टेक., अभियांत्रिकी डिप्लोमा, फार्मसी आणि आयटीआय अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

मागील रोजगार मेळाव्यांना दरवर्षी १८० हून अधिक कंपन्यांचा सहभाग, सुमारे १० ते १५ हजार इच्छुक उमेदवारांची उपस्थिती आणि ५ हजारांहून अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.

या मेळाव्यासाठी प्रवेश व नोंदणी विनामूल्य असून अधिक माहितीसाठी 8600100942 या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करणे अनिवार्य असुन इच्छुक उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे संस्थापक सचीव व जॉब फेअरचे मुख्य आयोजक डॉ . दीपक शहा यांनी केले आहे.

# वीर पाणी योजनेच्या कामाची सासवडच्या पालिका पदाधिकाऱ्यांकडून पाहणी

■ **परिंचे (दै. संध्या)**

सासवड शहरासाठी नगरोत्थान योजने अंतर्गत मंजूर झालेल्या १४३ कोटी रुपयांच्या आणि ३४ किलोमीटर लांबीच्या नवीन वीर पाणी पुरवठा योजनेचे काम वीर धरण येथे सुरू असून याची गुरूवारी (ता. २४) नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या योजनेत आधुनिक क्षमतेचे पंप हाऊस, शक्तिशाली बुस्टर पंप आणि तब्बल ६०० एमएम व्यासाची (दोन फूट) मुख्य जलवाहिनी तसेच पांगारे खिंडीत तब्बल २०० एमएलडी क्षमतेचा विशाल पाणी साठवण तलाव उभारला जाणार असून, तिथेच एक अत्याधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प उभा राहणार आहे. याबरोबरच शहराच्या विविध भागांत एकूण ४६ लाख ५० हजार लिटर क्षमतेच्या नवीन पाण्याच्या टाक्या उभारल्या जाणार आहेत.

यामुळे पांगारे खिंडीतून थेट शहरातील मुख्य सातही टाक्यांमध्ये पाणी पोहोचवणे अत्यंत सोपे होणार असल्याचे पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे यांनी सांगितले. या पाहणी दौऱ्यादरम्यान नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे यांच्यासह उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत , तसेच साकेत जगताप, सुहास जगताप , सौरभ वढणे, सुनील जगताप यांच्यासह नगरपालिकेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.








दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी दीक्षाभूमीवर चोख सोयी

नागपूर : नागपूर येथील दीक्षाभूमीवर २० ऑक्टोबर रोजी साजरा होणारा धम्मचक्र प्रवर्तन दिन हा देशभरातील अनुयायांसाठी महत्त्वाचा सोहळा आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या लाखो अनुयायांना आवश्यक सोयी-सुविधा वेळेत आणि सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला प्रभारी विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस उपायुक्त संदीप पखाले, आदित्य मिरखेलकर, सिंगा रेड्डी, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अनुयायांच्या सोयी-सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करून महोत्सवाचे नियोजन करावे, असे डॉ. कांबळे यांनी सांगितले. यावेळी समाज कल्याण विभागाच्या वतीने अनुयायांसाठी करण्यात येणाऱ्या सुविधांचे सादरीकरण करण्यात आले. दीक्षाभूमी परिसरात निवासासाठी जर्मन हँगर तंत्रज्ञानावर आधारित निवारा कक्ष उभारण्यात येणार असून, त्यामध्ये पंखे, कुलर्स, प्रकाशयोजना तसेच अंथरूण-पांघरूणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. या निवारा कक्षांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याशी संबंधित नावे देण्यात येणार आहेत. निवारा कक्षांच्या परिसरात संविधान साहित्याची 'भीमसृष्टी' उभारण्यात येणार आहे. तसेच तक्रार निवारण केंद्र, महिलांसाठी हिरकणी कक्ष, बालकांसाठी खेळण्याची जागा आदी व्यवस्था करण्यात येणार आहे. अनुयायांच्या आरोग्याच्या दृष्टीने औषधसाठा, वैद्यकीय कक्ष, मोबाईल रुग्णालये आणि रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करून देण्यात येतील. स्वच्छतेसाठी नियमित स्वच्छता, जंतुनाशक व डास प्रतिबंधक फवारणी, मोबाईल स्वच्छतागृहे आणि कचराकुंड्यांची पुरेशी व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीला गती

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेले जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थी तसेच इयत्ता १२ वीमध्ये शिक्षण घेत असलेले आणि व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे मागासवर्गीय विद्यार्थी यांना या मोहिमेचा लाभ मिळणार आहे. अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग, एसईबीसी आदी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस्तरावर प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी त्रुटीपूर्तता शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. प्रकरणांमधील त्रुटींची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या विशेष मोहिमेमुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे कामकाज अधिक पारदर्शक, लोकाभिमुख आणि गतिमान होऊन विद्यार्थ्यांना विहित वेळेत जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे. मोहिमेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सामाजिक माध्यमे तसेच अन्य माध्यमांतून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे.



# गणरायावर मान्यवरांकडून पुष्पवृष्टी; 'कुबुद्धीचे विसर्जन करून सर्वांना सुबुद्धी येवो' : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

गिरगाव चौपाटी येथे गणेश विसर्जन सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गणरायावर पुष्पवृष्टी केली. भक्तिभावाने श्री गणेशाला निरोप देताना, कुबुद्धीचे विसर्जन करून सर्वांना सुबुद्धी येवो अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी गणरायाला केली.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात गणेश विसर्जनाच्या मिरवणुका चांगल्या पद्धतीने सुरू आहेत. विशेषतः मुंबई आणि पुणे शहरात पोलीस प्रशासन तसेच महानगरपालिकांनी अतिशय चांगली व्यवस्था केली आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणुका सुरळीत आणि शांततेत पार पडत आहेत. देशातील तसेच जगातील चांगल्या आणि सक्षम पोलीस दलांपैकी महाराष्ट्र पोलीस दल आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'कुबुद्धीचे विसर्जन करा आणि सगळ्यांनाच सुबुद्धी येवो,' अशी प्रार्थनाही त्यांनी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गणेशोत्सवाच्या




काळात नागरिकांनी शिस्त आणि पर्यावरणपूरकतेच्या आवाहनाला प्रतिसाद देत उत्सव साजरा केला आहे. मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोलिसांकडून या उत्सवाचे अतिशय शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले आहे. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितू तावडे, खासदार मिलिंद देवरा, आमदार अमित साटम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, आयुक्त अश्विनी भिडे, मुंबईच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, बेस्ट समिती अध्यक्षा तृष्णा विश्वासे, अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, उपायुक्त चंदा जाधव आणि प्रशांत सपकाळ, सहायक आयुक्त संतोष साळुंके तसेच विविध देशांचे भारतातील महावाणिज्यदूत आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## गणेशोत्सव मंडळांतून शासकीय योजनांचा जागर

■ मुंबई(दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या लोकसंवाद उपक्रमांतर्गत मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या व्याज परतावा योजनांसह विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

गुरुवारी लोकसंवाद उपक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाजवळील बी.टी. मार्ग परिसरातील गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. या लोकसंवाद उपक्रमास जी.टी. हॉस्पिटल मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अजित धामणस्कर, खजिनदार साई सुर्वे, सचिव उदय मोरे, पोलीस आयुक्त कार्यालय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यश शेलार, श्रीधर मोहिते, तसेच मंगलदासचा राजा, मंगलदास सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, क्रॉफर्ड मार्केट परिसरातील भाविक व नागरिक उपस्थित होते.

यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांबाबत सोमनाथ आहेर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. वरिष्ठ सहायक संचालक वंदना थोरात यांनी लोकसंवाद उपक्रमाचा उद्देश स्पष्ट करून अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. आयुष्मान कार्डबाबत वरिष्ठ सहायक संचालक



मनीषा सावळे यांनी माहिती दिली.

सोमनाथ आहेर यांनी सांगितले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगारासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (आयआर-१) आणि गट कर्ज व्याज परतावा योजना (आयआर-२) राबविण्यात येतात. व्यवसाय किंवा उद्योगासाठी संबंधित बँकेकडून कर्ज मंजूर व वितरित झाल्यानंतर लाभार्थ्याने कर्जाचे हप्ते वेळेत भरल्यास, पात्र व्याजाचा परतावा महामंडळामार्फत दिला जातो. या योजना ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत कर्जमर्यादा वाढविण्यात आली असून पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार कमाल १२ टक्के वार्षिक दराने, निर्धारित कालावधीसाठी पात्र व्याजाचा परतावा देण्यात येतो. गट कर्ज व्याज परतावा योजनेत गटातील सदस्यसंख्येनुसार कर्जमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. पात्र गटाने कर्जाचे हप्ते वेळेत भरल्यास नियमानुसार व्याज परतावा अनुज्ञेय आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रांसह पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प अहवाल व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बँकेकडे कर्जासाठी अर्ज करावा. कर्ज मंजुरीचा निर्णय बँक आपल्या नियमांनुसार घेते.

## नाशिक व कोकण विभागात २९ सप्टेंबरला पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ

■ मुंबई(दै. संध्या)

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ मेळावा' या रोजगार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय 'रोजगार महाकुंभ' मेळावे निवडणुक आचारसंहिता लागू झाल्यामुळे टप्प्याटप्प्याने आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानुसार, पहिल्या टप्प्यात नाशिक आणि कोकण विभागातील रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील एसएनडीटी महिला विद्यापीठात महिलांसाठी विशेष रोजगार मेळाव्याचे उद्घाटन २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे अशी माहिती कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

नाशिक व कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये २९ सप्टेंबर रोजी ४१८ हून अधिक ठिकाणी रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार असून, युवक-युवतींना त्यांच्या पात्रता व कौशल्यानुसार थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.नाशिक व कोकण विभागात आतापर्यंत दीड हजारांहून अधिक कंपन्या व नियोक्त्यांनी रोजगार महाकुंभासाठी सहभाग नोंदवला आहे. तसेच १ लाखांपेक्षा अधिक इच्छुक युवक-युवतींनी नोंदणी केली असून, सहभागी कंपन्यांकडून २५ हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी व रिक्त पदांची मागणी नोंदविण्यात आली आहे. जिल्हानिहाय उद्योग, शैक्षणिक संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), महाविद्यालये, स्थानिक प्रशासन आणि अन्य संस्थांच्या समन्वयातून उमेदवार व नियोक्त्यांचे 'कॅन्डिडेट–व्हॅकन्सी मॅचिंग' करण्याची प्रक्रिया सुरू आहे. रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने विभागामार्फत 'प्री-प्लेसमेंट ट्रेनिंग ड्राइव्ह' राबविण्यात आली आहे. यामध्ये व्यक्तिमत्त्व विकास, सॉफ्ट स्किल्स, संवाद कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, मुलाखतीची तयारी आणि रोजगारक्षम कौशल्ये आदी विषयांवर प्रशिक्षण देण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यातील बॅच २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात आली आहे. महिलांच्या रोजगार सहभागाला विशेष प्रोत्साहन देण्यासाठी २९ सप्टेंबर रोजी मुंबईतील एसएनडीटी महिला विद्यापीठात महिलांसाठी विशेष रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहे. या मेळाव्यात महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे उद्योग, कंपन्या, सेवा क्षेत्रातील आस्थापना आणि रिक्रूटमेंट एजन्सींचा सहभाग राहणार आहे. याच ठिकाणी नाशिक व कोकण विभागातील रोजगार महाकुंभाचा एकत्रित उद्घाटन समारंभ आयोजित करण्याचे नियोजन होती.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संकल्प; मूर्ती संकलनासाठी शिवसेनेकडून दोन केंद्रांची व्यवस्था

**आळंदी: दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी आळंदी शहर शिवसेनेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संकल्प करण्यात आला आहे. शहरप्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या पुढाकारातून गणेशमूर्ती संकलनासाठी दोन ठिकाणी संकलन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. गणेशभक्तांनी श्री गणेशमूर्तींचे नदीपात्रात विसर्जन न करता त्या संकलन केंद्रावर श्रद्धेने दान कराव्यात, असे आवाहन चव्हाण यांनी केले आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकतेचा उत्सव असून, धार्मिक भावना जपत पर्यावरणाचे संरक्षण करणे हीदेखील प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. संकलन केंद्रे भाजी मंडई वाहनतळ पार्किंग, चाकण चौक व वैतागेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगत व्यवस्था करण्यात आली आहे. इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांनी नदीपात्रात गणेशमूर्तींचे विसर्जन न करता संकलन केंद्रांचा वापर करावा. या उपक्रमात गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन 'गणेशोत्सव भक्तीचा, पर्यावरण संरक्षणाचा' हा संदेश कृतीतून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पांगारे पुरंदरचा झेंडा सातासमुद्रापार ; काकडेला ऑस्ट्रेलियात विशेष सन्मान

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील पांगारे गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



गावचे पहिले सरपंच ब. पा. काकडे यांचा नातू आणि प्रा. राजेश काकडे यांचे चिरंजीव प्रज्ञेश काकडे याने शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश मिळवत गावाचे, आई-वडिलांचे आणि देशाचे नाव सातासमुद्रापार उज्ज्वल केले आहे. प्रज्ञेश याने पुण्यातील नामांकित एमआयटी महाविद्यालयातून बी.टेकची पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. त्यानंतर त्याने पुढील शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियातील जगप्रसिद्ध आरएमआयटी विद्यापीठ, मेलबर्न येथे एमएस अर्थात पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश मिळविला. तेथेही त्याने आपल्या अभ्यासातील सातत्य आणि चिकाटी कायम ठेवत विशेष प्राविण्यासह पदवी संपादन केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आरएमआयटी विद्यापीठाच्या वतीने पुढील महिन्यात मेलबर्न येथे विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी प्रज्ञेशसह त्याचे आई-वडील प्रा. राजेश काकडे आणि सौ. काकडे यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. या सन्मानासाठी भारत सरकारने काकडे दाम्पत्याचा पारपत्र मंजूर करून सर्व आवश्यक प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून दिली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलाने जिद्द, मेहनत आणि मनापासून अभ्यासाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. आजच्या धावपळीच्या युगात तरुणाईसमोर अनेक प्रलोभने असताना प्रज्ञेशने केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करून हे यश खेचून आणले आहे. मुलांनी मनापासून कष्ट घेतले तर यश नक्कीच मिळते आणि आपल्या गावाचे, आई-वडिलांचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करता येते, हेच त्याने कृतीतून दाखवून दिले आहे. प्रज्ञेशच्या या दैदिप्यमान यशाबद्दल पुणे जिल्हा पत्रकार संघ, पुरंदर तालुक्यातील विविध सामाजिक संघटना, ग्रामस्थ, नातेवाईक आणि सर्वच स्तरातून त्याचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे. पांगारे गावात सध्या आनंदाचे वातावरण असून गावातील पहिली पिढी ते आजची तिसरी पिढीपर्यंत शिक्षणाचा वारसा कसा जपला जातो याचे हे उत्तम उदाहरण असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. विद्येच्या जोरावर जागतिक पटलावर आपली ओळख निर्माण करणाऱ्या प्रज्ञेशच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




### फुले-सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या ओतूरच्या शाळेला व्हिसेरा-विवोचा मदतीचा हात

**ओतूर : दैनिक संध्या**

ओतूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ (मुलींची शाळा) येथे व्हिसेरा इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. आणि विवो मोबाईल इंडिया प्रा. लि. यांच्या सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक दायित्व) उपक्रमातून विविध शैक्षणिक व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांमुळे शाळेच्या भौतिक वातावरणात लक्षणीय बदल झाला असून विद्यार्थिनींसाठी अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि बालस्नेही वातावरण निर्माण झाले आहे. सीएसआर निधीतून शाळेच्या टेरेसचे प्रशस्तिकरण, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज डायनिंग हॉल, आधुनिक हँडवॉश स्टेशन तसेच संपूर्ण शालेय इमारतीचे आकर्षक रंगकाम करण्यात आले आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांना अपुऱ्या जागेत मध्यान्ह भोजन घ्यावे लागत होते. नवीन डायनिंग हॉलमुळे विद्यार्थिनींना एकत्रितपणे स्वच्छ व शिस्तबद्ध वातावरणात भोजन करता येणार आहे. आधुनिक हँडवॉश स्टेशनमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी रुजण्यास मदत होणार असून, रंगरंगोटीमुळे शाळेचे वातावरण अधिक प्रसन्न व आकर्षक झाले आहे. या विकासकामांचे उद्घाटन व्हिसेरा कंपनीच्या एचआर हेड सौम्या बक्षी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विवो कंपनीचे प्रतिनिधी रोहित वाकाले, जिल्हा परिषद सदस्य छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वैशाली तांबे व सर्व सदस्य, मुख्याध्यापिका विजया हाडवळे, शिक्षक, पालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी शिक्षण हे विकासाचे मुख्य साधन असून ग्रामीण भागातील शाळांना आवश्यक सहकार्य करणे हे सामाजिक दायित्व असल्याचे सांगितले. सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शाळांपैकी ग्रामीण भागात आजही सुरू असलेली व अस्तित्वात असलेली ही शाळा पाहून आनंद झाला असून, भविष्यातही शाळेला आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे आश्वासन त्यांनी दिले. मुख्याध्यापिका विजया हाडवळे यांनी व्हिसेरा इलेक्ट्रॉनिक्स व विवो मोबाईल इंडिया कंपनीचे आभार मानले. उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शैक्षणिक वातावरण मिळण्यासोबतच शाळेची पटसंख्या वाढण्यास आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# युथ फाउंडेशनची विसर्जन मिरवणूक पारंपरिक पद्धतीने

■ **काऱ्हाटी (दै. संध्या)**

काऱ्हाटी-(ता.बारामती) येथील युथ फाउंडेशन क्लब मंडळाची गणपती विसर्जन मिरवणूक पारंपरिक पद्धतीने काढण्यात आली. यावेळी गुलालाला फाटा देऊन फुलांची उधळण करत मंडळांनी एक वेगळा आदर्श घालून दिला आहे. मंडळाचे दरवर्षी विविध उपक्रम असल्याचे मंडळाचे अध्यक्ष यांनी सांगितले. यावेळी मंडळाचे कार्यकर्ते, पोलीस कर्मचारी आदी ग्रामस्थ बहुसंख्य उपस्थित होते.

## ओम इंटरनॅशनल स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव



■ **आळंदी : (दै. संध्या)**

यश एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशनच्या ओम इंटरनॅशनल स्कूल शेलगाव व पिंपळगाव या दोन्ही शाखांमध्ये शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तीचे कुंडीत विसर्जन करून त्यात रोप लावण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थी व पालकांसमोर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा आदर्श ठेवण्यात आला. परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

यावेळी शिक्षक-पालक समन्वय समितीचे अध्यक्ष जयवंत हुद्दार, नीलम दौंडकर, सदस्य सूरज इंगळे, प्रांजल दौंडकर, पायल चेडे तसेच राजू साळुंके, किरण दौंडकर, विशाल इंगळे, अप्पासाहेब बवले, तुषार गंगावणे, सरिता गुळवे, निकिता नरोडे, संगीता कदम, पूजा मोरे, अश्विनी थोरे, राजश्री तोटकर आदी पालक उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा सपना कारंडे, सचिव दत्तात्रय कारंडे, सलमा मुलानी, श्वेता कुलकर्णी, दीक्षिता मोहिते, आशा बवले, सोनाली साबळे, नेहा भाडळे, निशा मरळ , मंगल भोसकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## गणराया दुष्काळावर मात करण्याची शक्ती दे : सचिन अहिर

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर दुष्काळाचे संकट आले आहे. गणराया दुष्काळावर मात करण्याची शक्ती दे अशी मागणी मी गणपती बाप्पाच्या चरणी आज केली आहे असे विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी सांगितले.

गुरुवारी, (दि.२४) भोसरी येथील सीआयइ ऑटोमेटिव्ह इंडिया लि. या कंपनीच्या गणपतीची आरती सचिन अहिर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी आमदार महेशदादा लांडगे, शिवसेना उपनेते व ज्येष्ठ नगरसेविका सुलभा उबाळे, सीआयइ कंपनीचे अधिकारी विनायक कळसकर, निवृत्ती बच्छाव, बाळासाहेब पाटील, प्रशांत शर्मा, कामगार संघटनेचे पदाधिकारी कृष्णदेव थोरात, दीपक अरगडे, सुभाष जमादार, दत्तात्रय धावडे, ज्ञानेश्वर कळमकर आदी उपस्थित होते.

यानंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना सचिन अहिर म्हणाले की,



महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आहे. दुष्काळाची राज्य सरकारने योग्य दखल घेतली आहे. केवळ अहवालावर अवलंबून न राहता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेत आहेत. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दुष्काळा विषयी तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अहवाल प्राप्त होताच मुख्यमंत्री याविषयी निर्णय जाहीर करतील. दुष्काळाविषयी विशेष अधिवेशन घेण्याचा प्रस्ताव सरकारकडे नाही. पुढील दीड ते दोन महिन्यात अधिवेशन होईल त्या अधिवेशनात दुष्काळ विषयावर आमदार आपल्या भावना मांडू शकतील. त्यापूर्वीच सर्व सुरळीत होईल.

## "इंडस्ट्रियल एस्पायरा" तांत्रिक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

■ **पिंपरी: (दै. संध्या)**

युवती व महिलांना अभियांत्रिकी व उत्पादन क्षेत्रातील रोजगाराच्या संधीसाठी आवश्यक ते तांत्रिक कौशल्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इंजिनिअरिंग क्लस्टर, पुणे या संस्थेच्या वतीने महिलांसाठी मोफत सहा महिन्यांचे ऑफलाइन तांत्रिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत अशी माहिती इंजीनियरिंग क्लस्टर पुणे या संस्थेचे संचालक सागर शिंदे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टीम, पुणे यांच्या सीएसआर सहकार्याने २८ सप्टेंबर पासून सुरू होत असलेल्या पूर्णतः मोफत असलेल्या "इंडस्ट्रियल एस्पायरा-ॲडव्हान्स सर्टिफिकेशन इन सीएनसी ऑपरेशन डिझाईन अँड कॉलिटी कंट्रोल" या ऑफलाइन तांत्रिक प्रशिक्षण वर्गाची ही तिसरी बॅच आहे. या उपक्रमांतर्गत उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामध्ये सीएनसी प्रोग्रामिंग व ऑपरेशन, डिझाईन, क्वालिटी कंट्रोल, मॅन्युफॅक्चरिंग, सॉफ्ट स्किल, प्रत्यक्ष औद्योगिक भेटी, प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि ऑन द जॉब ट्रेनिंग यांचा समावेश आहे. हे ६ महिन्यांचे प्रशिक्षण २८ सप्टेंबर २०२६ पासून इंजीनियरिंग क्लस्टर पुणे, भोसरी एमआयडीसी, ५३६ जे ब्लॉक, गवळीमाथा जवळ येथे सुरू होणार आहे. या प्रशिक्षणासाठी किमान बारावी उत्तीर्ण आणि १८ ते २५ वर्षे वयोगटातील युवती, महिला अर्ज करू शकतात. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर पुणे व परिसरातील इंजिनिअरिंग व मॅन्युफॅक्चरिंग उद्योगांमध्ये रोजगारासाठी प्लेसमेंट सपोर्ट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील निवडक ५ प्रशिक्षणार्थींसाठी निवास व भोजनाची सुविधा पूर्णतः मोफत उपलब्ध आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त स्वच्छतेचा जागर

■ **नारायणगाव: (दै. संध्या)**

स्वच्छ परिसर हीच निरोगी समाजाची पहिली पायरी आणि सामाजिक बांधिलकीची सुरुवात स्वतःपासूनच होते, हा संदेश देत हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, राजगुरुनगर, पुणे येथे , दि. 24 सप्टेंबर 2026 ला राष्ट्रीय सेवा योजना (NSS) स्थापना दिनानिमित्त स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले.



महाविद्यालय परिसरातील स्वच्छता राखण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सामाजिक उत्तरदायित्व आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून 'स्वच्छ परिसर, सुंदर परिसर' हा संदेश कृतीतून अधोरेखित केला.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार दिलीप अण्णा मोहिते पाटील, खजिनदार सुरेखाताई मोहिते पाटील, सचिव शिवाजीराव मोहिते पाटील, प्राचार्य प्रा.डॉ.किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. एनएसएस विभागप्रमुख प्रा.अभिजीत वैद्य यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेतला. यावेळी प्रा.किरण काळे, प्रा.संदीप तायडे, प्रा.सलोनी वाडेकर, प्रा.विनय राऊत, प्रा.प्राजक्ता घोलप, प्रा.ज्योती सांडभोर, प्रा. विद्या सांडभोर तसेच ग्रंथपाल बच्चे मॅडम यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव, श्रमप्रतिष्ठा आणि सामूहिक जबाबदारीचे दर्शन घडविले. 'स्वच्छ परिसर, सुंदर परिसर' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा जागर केला.

# लोककलेतील श्रीगणेश विशेष टपाल तिकिटाचा वापर करा : शेलार

■ **मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन व प्रसार करण्यासाठी टपाल विभागाने तयार केलेल्या 'लोककलेतील श्रीगणेश' या विशेष टपाल तिकिटाचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वापर करावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरात आयोजित 'लोककलेतील श्रीगणेश' या विशेष कार्यक्रमात मंत्री ॲड. शेलार यांच्या हस्ते या विशेष टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्टर जनरल रामचंद्र किसन जायभाये (भा.डा.से.), सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर, गणेशभक्त आणि नागरिक उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाला युनेस्कोच्या जागतिक अमूर्त वारसा यादीत स्थान मिळवून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचेही मंत्री ॲड. शेलार यांनी यावेळी सांगितले. गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देऊन त्याअनुषंगाने विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, धार्मिक अधिष्ठान लाभलेल्या गणेशोत्सवामध्ये व्यापक लोकसहभाग, कल्पकता, नावीन्य, कलात्मकता आणि सामाजिक भान यांचा संगम दिसतो. गणेशोत्सवाच्या प्रथा-परंपरा



महाराष्ट्रासह देश-विदेशात विस्तारल्या आहेत. या उत्सवाचे वैश्विक अद्वितीय सांस्कृतिक मूल्य जगासमोर मांडण्यासाठी आवश्यक व्यासपीठ निर्माण करणे गरजेचे आहे. त्याची पहिली पायरी म्हणून राज्य शासनाने गतवर्षी गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला. राज्य महोत्सवाच्या माध्यमातून राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. रवींद्र नाट्य मंदिरात तीन दिवसांचा शास्त्रीय संगीत महोत्सव आयोजित करण्यात आला असून ओडिशा, अंदमान-निकोबार आणि दुबई येथेही राज्य महोत्सवाचे कार्यक्रम घेण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री ॲड. शेलार यांनी दिली.सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्यभर वर्षाकाठी एक हजारांहून अधिक कार्यक्रम आयोजित केले जातात. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, त्याचे जतन व संवर्धन करणे आणि त्याला जागतिक स्तरावर स्थान मिळवून देणे, हा या उपक्रमांचा उद्देश असल्याचेही मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्टर जनरल रामचंद्र किसन जायभाये यांनी सांगितले की, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ मध्ये सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाने समाजातील विविध घटकांना एकत्र आणले. सांस्कृतिक कार्यक्रम, जनजागृती आणि स्वातंत्र्यलढ्यातही या उत्सवाने महत्त्वपूर्ण योगदान दिले.